N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

**1. District (जिल्हा):** पुणे ग्रामीण　　**P.S.(ठाणे):** दौंड

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0474　　**Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 23/07/2025 20:56

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

**1. Day(दिवस):** मंगलवार　　**Date From (दिनांक पासून):** 14/01/2025

**Time Period (कालावधी):** पहर 6　　**Date To ( दिनांक पर्यंत):** 14/01/2025

**Time From (वेळेपासून):** 15:43 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 16:40 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 23/07/2025　　**Time (वेळ):** 20:00 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 033

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 23/07/2025 20:22 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 3 किमी　　**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** देवपाम ग्रहनिर्मा सोसायटी दोड

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री महेश संभाजी जाधव
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1988
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मुपो काष्टी ता श्रीगोंदा,जि- अहमदनगर,दौंड ,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मुपो काष्टी ता श्रीगोंदा,जि- अहमदनगर,दौंड ,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-7770000055

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री विजयकुमार मधुकर हावशेट्टे | | | 1. व्यंकटेश पार्क A विंग रुम नं , 101 देवकी नगर गोपाळवाडी दौंड,दौंड ,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):
दौंड पो स्टे गु.रजि.नं. व कलम 474/2025 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7,7(A) प्रमाणे
फिर्याद
मी, श्री महेश संभाजी जाधव वय 37वर्षे, धंदा- व्यवसाय रा.- मुपो काष्टी ता .श्रीगोंदा जि- अहमदनगर ,
मोबाईल क्रमांक 7770000055
मी समक्ष हजर राहुन फिर्यादी जबाब देतो की, मी दिनांक 10/01/2025 रोजी 14.00 वाजता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे येथे हजर राहुन स्वाहस्ताक्षरात लिहुन आणलेली तक्रार दिली ती थोडक्यात पुढीलप्रमाणे"मी वरीलप्रमाणे असुन बीपीसीएल कंपनीकडे पेट्रोलपंपाचे डिलरशिपसाठी अर्ज केला आहे.पेट्रोलपंप उभारणीकरीता आवश्यक असलेली जागा मी मौजे दौंड स नं 202/08 हि निश्चित केली आहे.नमुद जागा हि श्री लालचंद बखतराय लुंड यांचे मालकिची आहे.
नमुद जागेवर पेट्रोल पंप उभारणीकरीता दौंड नगरपरिषदेची एन ए व बांधकाम परवाना याची आवश्यकता असल्याने श्री लुंड यांनी ती मिळण्याकरीता दौंड नगरपरिषद येथे दि.02/01/2025 रोजी अर्ज केला आहे.श्री लुंड हे वयोवृध्द असल्याने नमुद अर्जाचे पुढील काम पाहणीकरीता त्यांनी मला कुलमुखत्यार पत्र दिले आहे.
दि02/01/2025 रोजी दौंड नगरपरिषद येथील सहायक प्लॅनर श्री विजयकुमार हावशेट्टे यांनी त्यांचे मो क्र 9403143362 यावरुन माझा मो क्र 7770000055 वर मला साईट व्हिझीट साठी येथ असल्याचे ज्व्द्द्र्य ड्द्र्द्र मेसेज केला.
दि.03/01/2025 रोजी त्यांनी मेसजे केल्याप्रमाणे मी स नं 202/08 मौजे दौंड या ठिकाणी गेलो काही वेळत श्री विजयकुमार हावशेट्टे हे त्या ठिकाणी आहे.त्यांना जागेची पाहणी करुन झाल्यानंतर सव्हे अहवाल व पुढील कामकाज करुन देणेकरिता म्हंजे टेन्टटिव्ह ले आउट,फायनल ले आउट,आणि बांधकाम परवाना देणेकरीता माझ्याकडे 2,00,00(दोन लाख)रु ची लाच मागणी केली.तसेच दिनांक 14/01/2025 रोजी भेटणेकरिता बोलविले आहे.
मला श्री हावशेट्टे यांना लाच द्यायची नाही माझी श्री हावशेट्टे यांच्याबरोबर आर्थिक व्यवहार, आर्थिक वाद,पुर्व वैमनस्य नाही.माझ्या तक्रारी अर्जावर कारवाई करावी ही विनंती."वगैरे मजकुराची लेखी तक्रार दिली. ला.प्र.वि. कार्यालयाकडील पोलीस निरीक्षक श्री. रूपेश जाधव यांना माझ्या तक्रारीची पडताळणी करण्याकरीता नियुक्त केले होते. पोलीस निरीक्षक जाधव यांना मी माझ्या तक्रारीबाबत माहीती देवुन त्यांना लेखी तक्रार अर्ज दाखविला असता तो त्यांनी वाचुन त्यावर स्वाक्षरी केली अर्जा स्वताकडे ठेवला.
मी दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक 14/01/2025 रोजी लोकसेवक श्री हावशेट्टे नगरपरिषद दौंड यांना भेटणार असल्याने मी पोलीस निरीक्षक जाधव साहेब यांना दिनांक 14/01/2025 रोजी पडताळणी कारवाई करण्याची विनंती केली.त्यावेळी पोलीस निरीक्षक जाधव यांनी कारवाईकरिता कोणत्या ठिकाणी यावे याबाबत विचारणा माझ्याकडे केली असता मी त्यांना पाटस येथे आलेनंतर माझे मोबाईल क्रमांक यावरती संपर्क करण्यास सांगितले. दिनांक 14/01/2025 रोजी 6.30 वा पोलीस निरीक्षक जाधव यांनी लाप्रवि कार्यालयातुन निघाल्यांनतर मला सदरची माहिती फोन करुन दिली असता,मी त्यांना पाटस येथे आलेनंतर संपर्क करण्याचे सांगितले.त्यांनतर पोलीस निरीक्षक जाधव व पथक असे पाटस येथे आले असता त्यांनी त्याबाबत फोन करुन माहिती दिली.त्यावेळी मी त्यांना वायलेस फाटा परिसर येथे येवुन थांबणेबाबत सांगितले. त्यांनतर 8.40 वा पोलीस निरीक्षक जाधव यांनी मला ते वायरलेय फाटा येथुन नानवीज पोलीस प्रशिक्षण केद्र येथे जाणारे रोडवर असलेल्या रेल्वे लाईन ब्रिजचे शेजारी असलेले मोकळया जागेमध्ये वाहन पार्क करुन थांबले असल्याचे सांगितले. त्यानंतर 10.50 वाजणेचे सुमारास मी माझे खाजगी वाहन क्रमांक एम एच 16 डी झेड 3118 याने पथक थांबलेल्या ठिकाणी पोहचलो. त्यावेळी चालक म्हणुन माझे सोबत श्री गाडेकर यांना घेतले होते.मी माझे वाहन रस्त्याच्या बाजुला पार्क करुन वाहनामध्ये थांबणेबाबत श्री गाडेकर यांना सांगितले.त्यानंतर मी वाहनातुन उतरुन पोलीस निरीक्षक जाधव व पथक हे थांबलेल्या

मोकळ्या जागेत गेलो.
सदर ठिकाणी असलेले पंच व पथक यांची ओळख मला पोलीस निरीक्षक जाधव यांनी करुन दिली.त्यावेळी पंच क्र 1 म्हणुन श्री राहुल निकम व पंच 2 म्हणुन श्री केळगेंद्रे काम पाहतील असे सर्वानुमते ठरविण्यात आले. पोलीस निरीक्षक जाधव यांनी माझ्या तक्रारीविषयी पंच व पथक .यांना थोडक्यात माहीती दिली.त्यांनतर मी देखील माझे तक्रारीविषयी पंच व पथक यांना थोडक्यात माहिती दिली.त्यांनतर दिनांक 10/01/2025 रोजी मी लाप्रवि कार्यालय पुणे येथे सादर केलेला वर नमुद तक्रारी अर्ज पंचाना वाचण्यास दिला.पंचानी तो वाचुन त्यावर स्वाक्षरी केली.त्यानंतर दौंड नगरपरिषद येथे ले आउट मंजुरीकरीता श्री लुंड यांनी केलेला अर्ज व कुलमुखत्यारपत्र याची झेरॉक्स प्रत मी सादर केली त्यावर पोलीस निरीक्षक जाधव व पंचानी स्वाक्षरी केल्या
त्यानंतर पंच व मला व्हाईस रेकॉर्डरबाबत सर्व तपशिलवार माहिती व पडताळणीबाबत सुचना सांगून मी दिलेल्या तक्रारीनुसार लोकसेवक श्री विजकुमार हावशेट्टे, सहायक प्लॅनर,दौंड नगरपरिषद हे माझ्याकडे लाच मागणी करतात अगर कसे याबाबत पडताळणी करण्याचे ठरले. त्यानंतर पोलीस निरीक्षक जाधव यांनी त्यांचेकडील सॅनडिस्क कंपनीचे नवीन सिलबंद  कार्ड त्यांच्या वेस्टनातुन बाहेर काढुन त्याचे वर्णन  नोंद करुन सदर मेमरी कार्ड शासकीय व्हाईस रेकॉर्डरमध्ये  इनसर्ट केले. त्यानंतर शासकिय व्हाईस रेकॉर्डर चालु करुन त्यामध्ये माझे व पंच श्री निकम यांचे निवेदन 11.51 वा रेकॉर्ड करण्यात आले.व्हाईस रेकॉडीरमध्ये निवदेन घेतल्यंनतर,पोलीस निरीक्षक जाधव यांनी मला पडताळणी कामी रवाना होणेबाबत विचारले असता मी त्यांना श्री हावशेट्टे हे दुपारी 15.00 नंतर कार्यालयात येणार असुन त्यावेळी पडताळणी कारवाई रवाना होत असल्याचे सांगितले.त्यानंतर माझे महत्वाचे काम असल्याने ते करणेकरिता मी तेथुन निघुन गेलो. माझे काम झालेनतर 15.10 वाजे सुमारास मी पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो. त्यावेळी पोलीस निरीक्षक जाधव यांनी लोकसेवक श्री हावशेट्टे यांचेकडे पडताळणी कारवाईकरीता रवाना होणेबाबत विचारणा केली असता मी त्यांना सांगितले की, मला सदर ठिकाणी येणापुर्वी लोकसेवक श्री हावशेट्टी यांनी त्यं◌ाचे मो◌ाबईल क्रमांक 9403143362 यावरुन माझे मोबाईल क्रमांक 7770000055 यावर संर्पक करुन सांगितले की,ते आज रोजी दौंड नगरपरिषद कार्यालयात येणार नसुन ते राहत असलेल्या देवपाम सोसायटी दौंड येथे भेटतील. त्यावेळी पोलीस निरीक्षक जाधव यांनी माझेकडे पडताळणीबाबत विचारणा केली असता मी त्यांना पडताळणीकामी रवाना होणेपुर्वी लोकसेवक श्री हावशेट्टे यं◌ाना व्हॉटस्प कॉल करुन भेटणेकामी येत असल्याचे सांगतो असे सांगितले.त्यांनतर मी माझे मोबाईल क्रमांक 7770000055 यावरुन लोकसेवक श्री हावशेट्टे यांचे मो◌ाबईल क्रमांक 9403143362 यावर 15.31 वा व्हॉटस्प कॉल केला असता लोकसेवक श्री हावशेट्टी यांनी देवपाम सोसायटी येथे भेटणेकरीता बोलावले.सदरचा कॉल व्हाईस रेकॉडरमध्ये रेकॉर्ड करण्यात आला. त्यानंतर देवपाम सोसायटी येथे मला व पंच क्र 1 यांना पडताळणी कामी रवाना करणेबाबत ठरविण्यात आले. त्यावेळी 15.37 वा सुमारास श्री हावशेट्टे यांनी त्याचा मो क्र 9403143362 यावरुन माझ्या मो क्र7770000055 यावर व्हॉटसअप कॉल करुन सोसायटी जवळ आल्यावर फोन करा असे सांगितले. सदरचा कॉल शासकीय व्हाईस रेकॉर्ड करण्यात आला.त्यानंतर ◌मला पंच व पथक यांना पोलीस निरीक्षक जाधव यांनी पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने सुचना दिल्या.त्यानंतर शासकीय व्हाईस रेकॉडर चालु करुन माझ्याकडे दिला असता  तो मी माझ्या पॅन्टच्या पुढील बाजुच्या डाव्या खिश्यामध्ये ठेवला.त्यानंतर माझे खाजगी वाहन क्र एम एच 16 बी झेड 3118यामधुन मी व पंच क्र 1 श्री निकम असे देवपाम सोसयटी दौंड येथे  लोकसेवक  श्री हावशेट्टे यांच्याकडे पडताळणीकामी रवाना झालो.ती वेळ 15.43 अशी होती.
मी देवपाम सोसायटी दौंड येथे पंच श्री निकम यांचेसह गेलो तेथे गेल्यानंतर श्री हावशेट्टे यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांचे मोबाईल क्रमाक 9403143362 यावर माझे मो क्र 7770000055 यावरुन व्हॉटस्प कॉल केला आणि स्पीकर ऑन करुन बिल्डींगच्या खाली येवुन थं◌ाबलो असल्याचे सांगितले असता श्री हावशेट्टे यांनी  आम्ही थाबंलेल्या ठिकाणी येत असल्याचे सांगितले.काही वेळाने लोकसेवक श्री हावशेट्टे हे देवपाम सोसयटीच्या बिल्डींगच्या खाली आम्ही थांबलेल्या ठिकाणी आले. मी पंच श्री राहुल यांच्यासमक्ष श्री हावशेट्टे यांच्यासोबत माझ्या कामाबाबत बोलणी केली त्यानंतर मी लोकेसवक श्री हावशे◌ट्टे याना पंचासमक्ष  "ह्याच कस करायचं टेन्टेटिव्हच" अशी विचारणा केली असता त्यांनी  "या की हिकड" असे बोलुन मला सोसयटीच्या गार्डनमध्ये येण्याबाबत सांगितले. श्री हावशेट्टे यांनी मला गार्डनमध्ये येण्याबाबत सांगितल्यानंतर मी व पंच श्री राहुल असे हावशेट्टे यांचे मागोमाग सोसायटीसमोर असलेल्या  गार्डनमध्ये जावु लागलो असता लोकसेवक श्री हावशेट्टे यांनी माझा हात दाबुन इशाराने पंच श्री राहुल यांना थांबविणेबाबत सांगितले. त्यावेळी मी इशारा  करुन पंच श्री राहुल यांना थांबणेबाबत सांगितले.त्यानंतर आम्ही गार्डनमध्ये जावुन एका कठड्यावरती बसुन बोलणेकरुन लागलो पंच श्री राहुल हे आमचेकडे पाहत गार्डनच्या बाहेर थांबुन होते.गार्डनमध्ये बसल्यानंतर  श्री हावशेट्टी यांनी मला " तुम्ही साहेबाच बघताय का मीच हे करु सांगा " अशी विचारणा केली असता  मी त्यांना तुम्हीच बघा असे सांगितले.त्यावेळी हावशेट्टे मला "तुम्हाला फक्त माझं अपुर्ह केल

माझ मी हे केल साहेबाच्या लॉगिनला टाकल्यावर मी तुमाला बोलवणार त्या दिवशी साहेबांना बोलायाच"असे सांगितले यातील साहेब म्हणजे दौंड नगरपरिषद कार्यालय येथील मुख्याधिकारी श्री कावळे हे आहेत. मी श्री हावशेट्टे यांना तुम्ही सांगा असे बोललो असता त्यांनी " 80 टक्के टेन्टेव्हला आणि 20 टक्के काय असेल ते फायनलला द्यायच असत"असे मला सांगितल असता मी त्यांना ले आउटचे काम करुन देणेबाबत सांगुन "तुम्ही कितीची अपेक्षा ठेवली आहे"अशी विचारणा त्यांना केली असता श्री हावशेट्टी यांनी " मला तरी चार चार एक लगे " असे बोलले असता मी त्यांना चार लाख रुपये लय झाले सर... असे सांगितले असता श्री हावशेट्टे यांनी "चार करा...चार करा.. सीओ साहेबाना मी बोललो..चारच करा सीओ साहेबाना मी करतो" असे बोलले असता मी त्यांना चार लाख रुपये जास्त होत असल्याचे सांगितले असता श्री हावशेट्टे यांनी "एक काम करा... तीन करा" असे बोलले असता मी त्यांना"तीन लाख "असे बोलले असता त्यांना " हं"म्हणुन मान डोलावुन होकार दिला त्यावेळी मी त्यांना "त्याच्यात सीओ वगैरे सगळ"अशी विचारणा केली असता त्यांनी "नाय नाही" असे बोलले त्यावेळी मी त्यांना आमच पण ऐका असे सांगितले असता श्री हावशेट्टे यांनी "ठिकेय तीनमध्ये नाय साडेतीनमध्ये मी सीओचपण करतो" असे बोलुन साडेतीन लाख रुपायाची लाच मागणी त्याचे स्वत:साठी सीओ साहेबाकरिता केली त्यावेळी मी त्यांना लाच रक्कम कमी करणेबाबत विनंती केली असता त्यांनी त्यास नकार दिला. त्याचवेळी पंच श्री राहुल हे मी व श्री हावशेट्टे येथे बोलत बसलेल्या ठिकाणी आमचेजवळ आले त्यानंतर मी हावशेट्टे यांना "बर ठिकय चालन साडेतीन लाख रुपये द्यायचे तुम्हाला ..तुम्ही मला फायनल...... टेनटेटिव्ह आणि फायनल करुन द्यायच " असे बोललो असता श्री हावशेट्टे "बर ठिकेय"असे पंच श्री राहुल यांच्यासमक्ष मला बोलले मी लोकसेवक श्री हावशेट्टे यांना आता किती द्यायच अशी विचारणा केली असता त्यांनी "80 टक्के कराना. "असे मला सांगितले.असता मी त्यांना आता सगळे अशी विचारणा केली त्यावेळी लोकसेवक श्री हावशेट्टी यांनी "चलन भरल की फक्त अप्रुव्हलचा विषय..... आता देवु नका साहेबाच ठरल्याप्रमाणे द्या... माझ काय नंतर द्या" असे मला बोलले त्यानंतर श्री हावशेट्टे यांनी पंच राहुल यांचेबाबत माझेकडे विचारणा केली असता मी त्यांना मित्र असुन जॉबसाठी आला असल्याचे सांगितले.त्यानंतर मी त्यांना आज एक लाख रुपये देतो असे बोलले असता त्यांना सीओला अशी विचारणा माझ्याकडे केली. त्यावेळी मी माझे मोबाईलमध्ये असलेल्या कॅल्क्युरेटर अॅपमध्ये साडेतीन लाखाचे 80 टक्केनी किती होतात याचे कॅलक्युलेशन करुन "दोन ऍंशी......दोन ऐशीमध्ये.... तुम्हाला ऐंशी हजार रुपये आज देतो आणि दोन लाख रुपये माझ उद्या काम करुन द्या उद्या तुम्हाला दोन लाख रुपये देतो अण राहिलेल"असे बोललो असता श्री हावशेट्टी यांनी "ते फायनलला" असे सांगितले त्यानंतर लोकसेवक श्री हावशेट्टे यांनी टेनटिव्ह दिल्यानंतर भुमीअभिलेखवाले येवुन जागा मोजतात मार्किंग करुन प्रापॅर्टी कार्ड बनवुन देतात. ते सबमीट केल्यानंतर ते येवुन चेक करतील आणि फायनल मला देतील असे सांगितले त्यावेळी मी त्यांना अर्ध्या तासाने पाच वाजता पैसे देतो असे सांगितले असता त्यांनी निवांत काही नाही असे सांगितले त्यानंतर मी अर्ध्या तासात पैसे देतो असे सांगितले असता त्यांनी उद्या करा असे मला सांगितले.मी पंच राहुल यांना हे हावशेट्टे असे त्यांचे नाव सांगुन ओळख करुन दिली. सोसयटीचे पार्किंगचे ठिकाणी आलेनंतर माझे हावशेट्टी यांचेसोबत सोसायटीमध्ये असणारे वाहन पार्किंग जागा याबाबत बोलणे झाले. त्यानंतर मी हावशेट्टे यांना पैसे घेवुन येतो असे बोलले असता त्यांनी उद्या करा तुम्हाला फोन करतो असे सांगितले त्यानंतर मी व पंच असे 16.40 वा पथक थांबलेल्या ठिकाणी आलो असता माझेकडील व्हाईस रेकॉर्डर घेवुन बंद करण्यात आला.त्यावेळी 16.46 वाजे सुमारास हावशेटटी यांनी त्यांचे मो क्रमांक 9403143362 यावरुन माझे मो क्र 7770000055 यावर व्हॅटसअप कॉल करुन माझ्याकडे विचारणा केली की मी ज्या प्लॅटसाठी त्याच्याकडे टेनटिव्ह ले आउट व फायनल ले आउटची मागणी केली आहे त्यामध्ये इलेक्ट्रीक लाईट आहे का, झाडाचा अडथळा आहे का अशी विचारणा केली असता मी त्यांना मोकळा प्लॅट असल्याचे सांगितले.त्यानंतर सदरचे संभाषण व्हाईस रेकॉर्डव्दारे रेकॉर्ड करण्यात आले. त्यानंतर पोलीस निरीक्षक जाधव यांनी मला रवाना केल्यापासुन परत येईपर्यन्त घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली असता त्यांना मी वरील घडलेली हकीकत सांगितली.

सदर पडताळणी दरम्यान लोकसेवक श्री हावशेट्टे यांनी टेनटिव्ह लेआउट फायनल ले आउट हे करुन देणेकरिता माझ्याकडे स्वातकरिता आणि लोकसेवक श्री कावळे यांचेकरिता साडेतीन लाख रुपयाची मागणी केली आहे.पोलीस निरीक्षक जाधव यांनी पंच क्र 1 यांच्याकडे विचारणा केली असता पंच क्र 1 यांनी मी सांगितल्याप्रमाणे मिळती जुळती हककीत सांगितली.त्यानंतर सदरचे व्हाईस रेकॉर्डव्दारे झालेले संभाषण पोलीस निरीक्षक लॅपटॉप वर कॉपी करुन ऐकले असता त्यामध्ये मी व पंच श्री निकम यांनी सांगितेल्या हककीत या प्रमाणे असल्याचे दिसुन आले.नमुद पडताळणीमध्ये श्री हावशेट्टी यांनी स्वातकरिता आणि मुख्यअधिकारी दौंड नगरपरिषद श्री कावळे यांचेकरिता सुरुवातीला चार लाखाची मागणी करुन तडजोडी अंती साडे तीन लाख रुपायची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले.



पोलीस निरीक्षक
दौंड पोलीस स्टेशन

पोलीस निरीक्षक जाधव यांनी माझ्याकडे पुढील कारवाईबाबत विचारणा केली असता मी त्यांना श्री हावशेट्टे यांनी पडताळणी दरम्यान लाचेची मागणी केल्यानंतर चलन भरावे लागेल असे सांगितले त्यामुळे त्यांना चलनाची रक्कम भरणेबाबत फोन करुन विचारतो असे सांगितले.त्यानंतर मी माझे मो क्र 7770000055 यावरुन श्री हावशेट्टे यांच्या मो क्र 9403143362 यावर 18.22 वा सुमारास व्हॅटसअप कॉल केला असता त्यांनी तो रिसीव्ह केला नाही.त्यानंतर 18.23 वा जे सुमारास श्री हावशेट्टे यांनी त्यांच्या मो क्र 9403143362 यावरुन माझ्या मो क्र 7770000055 यावर व्हॅटसअप कॉल केला असता मी त्यांना चलनाची अमाउट किती होईल अशी विचारणा केली असता त्यांनी 15 मिनिटाल सांगतो असे मला सांगितले, सदरचे दोन्ही कॉल व्हाईस रेकॉर्ड मध्ये रेकॉर्ड करण्यात आले.त्यानंतर श्री हावशेट्टे यांना 18.32 वा जे सुमारास मो क्र 9403143362 यावरुन माझ्या मो क्र 7770000055 यावर व्हॅटसअप कॉल करुन जमीनीच्या जागेच्या क्षेत्राफळाविषयी विचारणा केली.त्यावेळी मी त्यांना त्याबाबत माहीती दिली.सदरचा कॉल व्हाईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड करण्यात आला.काही वेळ वाट पाहीली परंतु लोकसेवक श्री हावशेट्टे यांनी मला कॉल करुन चलनाची रक्कम सांगितली नाही.म्हणुन मी माझ्या मो क्र 7770000055 यावरुन लोकसेवक श्री हावशेट्टे यांच्या मो क्र 9403143362 यावर 18.47 वाजे सुमारास व्हॅटसअप क◌◌ॉल केला असता त्यांनी कॉल रिसीव्ह केला नाही.सदरचा कॉल व्हाईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड करण्यात आला.त्यानंतर मी पोलीस निरीक्षक जाधव यांना हावशेट्टी यांचा मला कॉल येईल त्याची वाट पाहु असे सांगितले.परंतु लोकसेवक श्री हावशेट्टे यांचा कॉल आला नाही म्हणुन मी लोकसेवक श्री हावशेट्टे यांना फोन करुन चलन अमाउंट किती आहे.याबाबत फोन करुन विचारणा करतो असे पोलीस निरीक्षक जाधव यांना सांगुन लोकसेवक श्री हावशेट्टे यांना मी माझ्या मो क्र 7770000055 यावरुन लोकसेवक श्री हावशेट्टे यांच्या मो क्र 9403143362 यावर 19.49 वाजे सुमारास व्हॅटसअप क◌◌ॉल करुन चलनाची अमाउट विचारली असता त्यांनी 40 हजार पर्यत जाईल असे मला सांगितले. सदरचा कॉल व्हाईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड करण्यात आला. त्यानंतर 19.52 वा सुमारास लोकसेवक श्री हावशेट्टे यांनी त्याचे मो क्र 9403143362 यावरुन माझे मो क्र 7770000055यावर व्हॅटअप कॉल करुन चलनाचे फॉरमेट कुंदनला पाठविले आहे.ते तयार करुन ठेवा उदया साहेबाची सही घेतो असे सांगितले. सदरचा कॉल व्हाईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड करण्यात आला.

पोलीस निरीक्षक जाधव यांनी दिनांक 14/01/2025 पडताळणीमध्ये लोकसेवक श्री हावशेट्टे यांनी माझ्याकडे टेनटिव्ह ले आउट व फायनल ले आउट मंजुर करुन देणेकरीता स्वताकरिता आणि लोकसेवक श्री कावळे मुख्यअधिकारी दौड नगरपरिषद याचेकरिता साडेतीन लाख रुपायाची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने पुढील कारवाईबाबत प्रोसडींग व्हावे किंवा कसे याबाबत विचारणा केली असता मी त्यांना हावशेट्टी यांनी दिनांक 14/01/2025 रोजीच्या पडताळणीमध्ये मागितलेली लाच रक्कम घेवुन दिनांक 15/01/2025 रोजी बोलविले आहे.तसेच नमुद पडताळणीमध्ये लोकसेवक श्री हावशेट्टी यांनी स्वताकरिता तसेच लोकसेवक श्री कावळे मुख्याअधिकारी दौड नगरपरिषद यांचेकरिता लाचेची मागणी केली आहे.त्यामुळे सदर लाच मागणीमध्ये लोकसेवक श्री कावळे यांचा सहभाग आहे किंवा कसे यांची खात्री करणेकरिता दिनांक 15/01/2025 रोजी लोकसेवक श्री विजय कावळे मुख्यअधिकारी दौंड नगरपरिषद यांच्याकडे लाचेच्या मागणीबाबत पडताळणी करण्यात यावी असे सांगितले.त्यामुळे सर्वानमुते पुढील पडताळणी श्री कावळे मुख्यअधिकारी दौड नगरपरिषद यांच्याकडे दिनांक 15/01/2025 रोजी करण्याचे ठरवुन दिनांक 14/01/2025 रोजीची पडताळणी कारवाई तात्पुरती स्थगित करण्यात आली.त्यावेळी पोलीस निरीक्षक जाधव यांनी मला दिनांक 15/01/2025रोजी सकाळी 11.00 वाजता सदर थांबलेल्या ठिकाणी येणेबाबत सुचना दिल्या.त्यानंतर पोलीस निरीक्षक जाधव पंच व पथक हे शासकीय वाहनाने 20.10 वा चे सुमारास ला प्र वि पुणे कार्यालय येथे रवाना झाले.सदरबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

दिनांक 15/01/2025 रोजी पडताळणी कारवाईकरीता पोलीस निरीक्षक जाधव,पंच व पथक वायलेस फाटा येथे 11.00 वाजता आले.त्यांनी मला फोन करुन पडताळणी कारवाईकरीता आलेबाबत सांगितले असता मी सदर ठिकाणी माझे खाजगी वाहन क्रमांक एम एच 16 बी झेड 3118 याने आलो..त्यावेळी लोकसेवक श्री कावळे मुख्यअधिकारी दौड नगरपरिषद यांचा लाचेच्या मागणीमध्ये सहभाग आहे किवा कसे याबाबत पडताळणी करिता दौड नगरपरिषद कार्यालय येथे मला व पंच क्र 1 श्री निकम यांना माझ्यासोबत पाठवुन लोकसेवक श्री कावळे यांची माझ्याकडे लाचेची मागणी आहे किंवा कसे याबाबत सर्वानमुते पडताळणी करण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर पोलीस निरीक्षक जाधव यांनी त्यांचेकडील सॅनडिस्क कंपनीचे नवीन सिलबंद कार्ड त्यांच्या वेस्टनातुन बाहेर काढुन त्याचे वर्णन नोंद करुन सदर मेमरी कार्ड शासकीय व्हाईस रेकॉर्डमध्ये इनसर्ट केले. माझे व पंच क्र 1 श्री निकम यांचे 12.44 वाजे सुमारास निवेदन घेण्यात आले.त्यानंतर सदर ठिकाणी आम्हास कारवाईचे अनुशंगाने पोलीस निरीक्षक जाधव यांनी सुचना दिल्या.

.त्यानतर 12.52 वाजे सुमारास माझ्याकडे शासकीय व्हाईस रेकॉर्डर चालु करुन दिला असता मी तो माझ्या पॅन्टच्या पुढील बाजुच्या डाव्या खिशात ठेवला.त्यानंतर मला पंच श्री निकम यांचेसह श्री लोकसेवक श्री कावळे मुख्याअधिकारी दौंड नगरपरिषद यांच्याकडे पडताळणीकामी माझे वर नमुद खाजगी वाहनाने पाठविले. मी व पंच श्री निकम असे दौंड नगरपरिषद कार्यालय येथे गेलो, त्यावेळी श्री कावळे यांच्या केबीनमध्ये खुप गर्दी असल्याने त्याच्या केबीनमध्ये जाता आले नाही.त्यावेळी सदर ठिकाणी लोकसेवक श्री हावशेट्टे आले.मी त्यांना सीओ साहेबाना भेटायच आहे असे सांगितले असता त्यांनी एवढ्या गर्दीत कस भेटायच असे मला बोलले त्यानंतर मी त्यांना चलन दिल का अशी विचारणा केली असता त्यांनी स्वता टाईप करुन सही घेतली असे सांगितले.त्यावेळी मी त्यांना चलनाच पैसे भरु का अशी विचारणा केली असता त्यांनी मला थांबण्यास सांगितले आणि तेथुन निघुन गेले, श्री कावळे यांच्या केबीनमध्ये जास्त लोक असल्याने मी व पंच श्री निकम असे त्यांच्या केबीनच्या बाहेर वाट पाहत राहीलो.काही वेळानंतर श्री कावळे हे केबीनमधुन बाहेर आले.त्यावेळी त्याच्यासोबत अन्य लोक केबीनमधुन बोलत बाहेर आले. त्यामुळे मला तिथे बोलणे करता आले नाही.लोकसेवक श्री कावळे हे त्याच्याबरोबर असलेल्या लोंकाशी बोलत नगरपरिषदेच्या खाली थांबलेल्या त्यांच्या वाहनाकडे गेले. आणि वाहनात बसले.लोकसेवक श्री हावशेट्टे हे तेथे येवुन श्री कावळे यांच्या वाहनात त्याच्या बाजुला बसले.त्यावेळी नमुद वाहन पुढे जावु लागले असता मी वाहनाच्या खिडकीच्या काचेवर टकटक केली असता श्री कावळे यानी वाहन थांबविले आणि खिडकीची काच खाली घेतली. त्यावेळी मी त्यांना श्री हावशेट्टे साहेबाच कालच बोलण झाल असे बोलले असता त्यांनी मला हो असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना थो्डी फास्ट प्रोसेस केली तर बर होईल असे बोलल असता थोड फास्ट करुन टाका असे श्री हावशेट्टे यांना उद्देशुन बोलले.त्यानंतर लोकसेवक श्री कावळे हे त्यांच्या वाहनातुन लोकसेवक श्री हावशेट्टे यांच्याबरोबर तेथुन निघुन गेले.त्यानंतर मी पथक थांबलेल्या ठिकाणी 14.26 वाजे सुमारास आलो.त्यावेळी पोलीस निरीक्षक जाधव यांनी माझेकडे पडताळणी कारवाईकरीता रवाना केल्यापासुन परत येईपर्यन्त घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली असती मी त्यांना वरीलप्रमाणे हकिकत सांगितली. त्यानंतर पोलीस निरीक्षक जाधव यांनी पंच क्र 1 यांचेकडे विचारणा केली असता त्यांनी माझेप्रमाणे मिळतीजुळती हकिकत सांगितली. पोलीस निरीक्षक जाधव यांनी व्हाईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण लॅपटॉपवर कॉपी करुन पंच व पथक यांचेसमक्ष ऐकली असता मी व पंच क्र 1 श्री निकम यांनी सांगितलेल्या हकिकतप्रमाणे हकिकत असल्याचे दिसुन आले.

सदरचे पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक श्री कावळे ,मुख्याधिकारी दौंड नगरपरिषद यांचेकडे लां्कांची खुप गर्दी असल्याने लाचेची मागणीबाबत बोलणे करता आले नाही तसेच लोकसेवक श्री कावळे आणि लोकसेवक श्री हावशेट्टे हे वाहनातुन कार्यालयातुन जात असताना झालेले बोलणे व्यवस्थीत झाले नाही झाले.त्यावेळी पोलीस निरीक्षक जाधव यांनी माझेकडे पुढील कारवाईबाबत विचारणा केली असता मी त्यांना दि.15/1/2025 रोजीचे पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक श्री कावळे यांचे केबीनमध्ये लोकांची गर्दी जास्त असल्याने श्री कावळे यांचा लाच मागणीमध्ये सहभाग आहे किंवा कसे याबाबत बोलणे करता आले नाही .तसेच लोकसेवक श्री कावळे व श्री हावशेट्टे हे वाहनातुन जात असताना त्यांचेबरोबर झालेले बोलणे व्यवस्थीत झाले नाही. लोकसेवक श्री कावळे यांचा सदर लाच मागणीमध्ये सहभाग आहे किंवा कसे याबाबत पडताळणी करावयाची असल्याचे सांगितले.त्यावेळी पोलीस निरीक्षक जाधव ,पंच व पथक यांनी दि.15/1/2025 रोजी झालेल्या पडताळणी कारवाईचे अवलोकन करुन श्री कावळे यांचेकडे पुढील पडताळणी करण्याचे ठरवुन माझेकडे विचारणा केली असता मी त्यानं्ा सांगितले की, दौंड नगरपरिषद कार्यालयात पडताळणी कारवाईकामी गेलो त्यावेळी तेथे असलेले कर्मचारी यांचेकडुन मला माहिती मिळाली आहे की, दि.16/01/2025 व दि.20/1/2025 रोजी पर्यन्त लोकसेवक श्री कावळे हे बाहेरगावी असल्याने कार्यालयात येणार नाहीत.त्यामुळे पुढील कारवाई दि.21/01/2025 रोजी करण्यात यावी अशी विंनती केली. त्यावेळी पोलीस निरीक्षक जाधव व पंच पथक यांनी पुढील कारवाई दिनांक 21/01/2025 रोजी करण्याचे ठरवुन दिनांक 15/01/2025 रोजीची पडताळणी कारवाई तात्पुरती स्थगित करण्यात आली.त्यानंतर पोलीस निरीक्षक जाधव व पथक सदर ठिकाणाहुन ला प्र वि पुणे कार्यालयाकडे 16.00 वा जे दरम्यान रवाना झाले. सदरबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

पोलीस निरीक्षक जाधव व पथक हे पडताळणी कारवाई करिता दि.21/01/2025 रोजी त्याचे खाजगी वाहन क्र एम एच 02 सी व्ही 1349 यामधुन वायरलेस फाटा रेल्वे लाईन ब्रीज जवळ आले.त्यांनी मला 12.00 वाजे सुमारास फोन सदर माहीती दिली. मी पथक थांबलेल्या ठिकाणी 12.30 वाजे सुमारास माझ्या खाजगी वाहनाने पोहचलो.त्यावेळी पोलीस निरीक्षक जाधव यांनी मला पुढील कारवाईस रवाना होणेबाबत सांगितले असता मी त्यांना सांगितले की,मी दौंड नगरपरिषद कार्यालयात संर्पक करुन श्री कावळे कार्यालयात आले का याबाबत माहिती घेतली असता श्री कावळे व श्री हावशेट्टे कार्यालयात आले नसुन कामानिमित्त् बाहेर गावी गेल्याची माहीती मला मिळाली आहे. आज रोजी लोकसेवक श्री कावळे व लोकसेवक श्री हावशेट्टे हे कार्यालयात येणार नसल्याने पडताळणी



निरीक्षक

कारवाई दिनांक 22/01/2025 रोजी करणेबाबत पोलीस निरीक्षक जाधव यांना विनंती केली असता पुढील पडताळणी दिनांक 22/01/2025 रोजी करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.
दिनांक 22/01/2025 रोजी रोजी पडताळणी कारवाईकरीता पोलीस निरीक्षक जाधव,पंच व पथक हे खाजगी वाहन क्र एम एच 02 सी व्ही 1349 यामधुन आले.त्यांनी मला लोकसेवक श्री कावळे यांच्याकडे पडताळणीकामी रवाना होण्यास सांगितले.त्यावेळी मी त्यांना लोकसेवक श्री कावळे यांच्या केबीनमध्ये लोकाची खुप गर्दी आहे सायकाळी लोकाची गर्दी कमी होईल त्यावेळी त्यांना जावुन भेटतो असे सांगितले.त्यानंतर दिनांक 15/01/2025 रोजीचे पडताळणीकामी वापरण्यात आलेले मेमरी कार्ड सलग वापण्याचे ठरविण्यात आले. नमुद मेमरी कार्ड व्हाईस रेकॉर्डरमध्ये इनसर्ट करुन व्हाईस रेकॉर्ड चालु केला आणि सदर मेमरी कार्डवर दिनांक 15/01/2025 रोजीच्या संभाषण फाईल रेकॉर्ड असल्याचे खात्री पंच व मला करुन दिली.त्यानंतर 16.54 वाजे सुमारास माझे व पंच श्री निकम यांचे पडताळणी निवेदन व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड करण्यात आले. त्यानंतर सदर ठिकाणी आम्हास कारवाईचे अनुशंगाने पोलीस निरीक्षक जाधव यांनी सुचना दिल्या.
.त्यानंतर 16.58 वाजे सुमारास माझ्याकडे शासकीय व्हाईस रेकॉर्डर चालु करुन दिला असता मी तो माझ्या पॅन्टच्या पुढील बाजुच्या डाव्या खिशात ठेवला.त्यानंतर मला पंच क्र श्री निकम यांचेसह श्री लोकसेवक श्री कावळे मुख्यअधिकारी दौंड नगरपरिषद यांच्याकडे पडताळणीकामी माझे वर नमुद खाजगी वाहनाने पाठविले. मी व पंच श्री निकम असे दौंड नगरपरिषद कार्यालय येथे गेलो.त्यावेळी कार्यालयात मला लोकसेवक श्री हावशेट्टी दिसुन आले नाही. मी व पंच क्र श्री निकम असे लोकसेवक श्री कावळे यांच्या केबीनकडे गेलो केबीनमध्ये लोकाची गर्दी असल्याने मी व पंच असे केबीनच्या बाहेर थांबुन राहीलो. काही वेळाने गर्दी कमी झाल्यानंतर मी पंच श्री निकम यांच्यासह लोकसेवक श्री कावळे यांच्या केबीनमध्ये गेलो.त्यावेळी श्री कावळे यांनी मला बोला की काय मग अशी विचारणा केली त्यावेळी मी त्यांना ले आउटची परमिशन होती.बरेच दिवस झाले एक ही काम झाल नाही म्हणुन तुम्हाला भेटाव असे बोललो असता लोकसेवक श्री कावळे मला काय विषय असेल तर लवकर क्लीउर करुन टाका असे बोलले असता मी त्यांना काय रिप्लाय देत नाही.असे बोललो असता लोकसेवक श्री कावळे मला मी सांगतो असले मॅटर माझेकडे नाही यायला पाहिजे असे मला बोलले आणि ःडॉक्युमेन्ट क्लीउर आहे का अशी माझ्याकडे विचारणा केली असता मी त्यांना बरोबर आहेत असे सांगितले.त्यावेळी मी त्यांना लोकसेवक श्री हावशेट्टे यांना बोलले असते तर थोड फास्ट काम केल असत असे सांगितले असता त्यांनी मला लोकसेवक श्री हावशेट्टे आहेत का अशी विचारणा केली असता मी त्यांना लोकसवक श्री हावशेट्टे कार्यालयात दिसले नाही असे सांगितले.त्यानंतर लोकसेवक श्री कावळे मला उद्या बघु असे बोलले त्यानंतर मी व पंच पथक थांबलेल्या ठिकाणी 17.48 वाजे सुमारास आलो. त्यावेळी पोलीस निरीक्षक जाधव यांनी माझेकडे पडताळणी कारवाईकरीता रवाना केल्यापासुन परत येईपर्यन्त घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली असती मी त्यांना वरीलप्रमाणे हकिकत सांगितली. त्यानंतर पोलीस निरीक्षक जाधव यांनी पंच क्र 1 यांचेकडे विचारणा केली असता त्यांनी माझेप्रमाणे मिळतीजुळती हकिकत सांगितली. पोलीस निरीक्षकजाधव यांनी व्हाईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण लॅपटॉपर कॉपी करुन पंच व पथक यांचेसमक्ष ऐकली असता मी व पंच यांनी सांगितलेल्या हकिकतप्रमाणे हकिकत असल्याचे दिसुन आले.
पोलीस निरीक्षक जाधव यांनी माझ्याकडे पुढील कारवाईबाबत विचारणा केली असता मी त्यांना सदर पडताळणीमध्ये लोकसेवक श्री कावळे मुख्याधिकारी दौंड नगरपरिषद पुणे यांना मी माझे कामाबाबत विचारणा केली असता त्यांनी माझे वरोबर संदिग्ध बोलणे करुन मला दिनांक 23/01/2025 रोजी भेटणेकरिता दौंड नगरपरिषद कार्यालय येथे बोलविले असल्याने पुढील पडताळणी दिनांक 23/01/2025 रोजी करणेबाबत विनंती केली. त्यावेळी पोलीस निरीक्षक जाधव व पंच पथक यांनी पुढील कारवाई दिनांक 23/01/2025 रोजी करण्याचे ठरवुन दिनांक 22/01/2025 रोजीची पडताळणी कारवाई तात्पुरती स्थगित करण्यात आली.त्यानंतर पोलीस निरीक्षक जाधव व पथक सदर ठिकाणाहुन ला प्र वि पुणे कार्यालयाकडे 18.30 वा जे दरम्यान रवाना झाले. सदरबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.
दिनांक 23/01/2025 रोजी पडताळणी कारवाईकरीता पोलीस निरीक्षक जाधव,पंच व पथक वायलेस फाटा येथे आले. त्यांनी सदरची माहीती मला फोन करुन दिली.परंतु वैयक्तीक कारणास्तव मी पथक थांबलेल्या ठिकाणी उशीरा 15.30 वा जे सुमारास माझे खाजगी वाहन क्रमांक एम एच 16 बी एम 7799 याने पथक थांबलेले ठिकाणी आलो. त्यानंतर माझे व पंच क्र 1 श्री निकम यांचे निवेदन 16.03 वाजे सुमारास व्हाईस रेकॉर्डमध्ये रेकॉर्ड केले. त्यानतर सदर ठिकाणी आम्हास कारवाईचे अनुशंगाने पोलीस निरीक्षक जाधव यांनी सुचना दिल्या .आणि मला व पंच क्रमांक 1 यांना पडताळणीकामी दौंड नगरपरिषद कार्यालय येथे रवाना करणेबाबत ठरविण्यात आले.त्यानंतर आम्हाला 16.13 वा सुमारास शासकीय व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझ्याकडे दिला असता तो मी माझ्या पॅन्टच्या पुढील बाजुच्या डाव्या खिश्यामध्ये ठेवला त्यानंतर मला पंच क्र श्री निकम यांचेसह श्री लोकसेवक श्री कावळे मुख्या

अधिकारी दौंड नगरपरिषद याच्याकडे पडताळणीकामी माझे वर नमुद खाजगी वाहनाने पाठविले.मी पंच क्र 1 यांचेसह दौंड नगरपरिषद कार्यालय येथे गेलो असता श्री कावळे कार्यालात हजर नव्हते मी तेथे चौकशी केली असता मला श्री कावळे हे कामाकरिता बाहेरगावी गेले असल्याचे समजले. त्यानंतर मी श्री हावशेट्टे बसतात त्या ठिकाणी गेलो असता ते कार्यालयात हजर नव्हते.म्हणुन मी त्यांना माझे मो क्र 7770000055यावरुन लोकसेवक श्री हावशेट्टे यांचा मो क्र 9403143362 यावर व्हाटसअप मेसेज केला असता त्यांनी वैयक्तीय रजेवर असलेबाबत मेसेज मला पाठविला.मी व मेसेज केला.मी त्यांना पुन्हा कुठे आहात असा मेसेज केला असता त्यांनी लातुर असा मेसेज मला पाठविला.मी व पंच श्री निकम यांनी लोकसेवक श्री कावळे यांची कार्यालयात वाट पाहीली परंतु ते कार्यालयात आले नसल्याने मी पंच क्र श्री निकम पथक थांबलेल्या ठिकाणी 17.21 वाजे सुमारास आलो.त्यावेळी पोलीस निरीक्षक जाधव यांनी माझेकडे पडताळणी कारवाईकरीता रवाना केल्यापासुन परत येईपर्यन्त घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली असती मी त्यांना वरीलप्रमाणे हकिकत सागितली. त्यानंतर पोलीस निरीक्षक जाधव यांनी पंच क्र 1 यांचेकडे विचारणा केली असता त्यांनी माझेप्रमाणे मिळतीजुळती हकिकत सांगितली.पोलीस निरीक्षक जाधव यांनी व्हाईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण लॅपटॉपर कॉपी करुन पंच व पथक यांचेसमक्ष ऐकली असता मी व पंच यांनी सांगितलेल्या हकिकतप्रमाणे हकिकत असल्याचे दिसुन आले.

पोलीस निरीक्षक जाधव यांनी माझ्याकडे पुढील कारवाईबाबत विचारणा केली असता मी त्यांना लोकसेवक श्री कावळे हे आज रोजी कार्यालयात हजर नसल्याने त्यांच्याकडे पडताळणी झाली नाही. तसेच श्री हावशेट्टी हे रजेवरआहेत.लोकसेवक श्री कावळे यांनी दिनांक 22/01/2025 रोजीच्या पडताळणीमध्ये लोकसेवक श्री हावशेट्टे यांना घेवुन बोलविले होते.त्यामुळे लोकसेवक श्री हावशेट्टे हे रजेवर आल्यानंतर लोकसेवक श्री कावळे यांच्याकडे पडताळणी कारवाई करण्याची विनंती केली.त्यावेळी सर्वानुमते पुढील कारवाई लोकसेवक श्री हावशेट्टे हे रजेवरुन आल्यानंतर करण्याचे ठरवुन दिनांक 23/01/2025 रोजीची पडताळणी कारवाई तात्पुरती स्थगित करण्यात आली.त्यानंतर पोलीस निरीक्षक जाधव व पथक सदर ठिकाणाहुन ला प्र वि पुणे कार्यालयाकडे 19.00 वा जे दरम्यान रवाना झाले. सदरबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

मी पोलीस निरीक्षक जाधव, यांना फोन करुन सांगितले की, लोकसेवक श्री हावशेट्टे हे दिनांक 29/01/2025 रोजी कार्यालयात रजेवरुन हजर होणार आहेत.अशी माहिती मला मिळालेली आहे.त्यामुळे दिनांक 29/01/2025 रोजी पडताळणी कारवाई करावी ,मी केलेल्या विनंतीनुसार दिनांक 29/01/2025 रोजी पडताळणी कारवाईकरीता पोलीस निरीक्षक जाधव,पंच व पथक आले.मी माझ्या खाजगी वाहन क्रमांक एम एच 16 बी झेड 3118 यामधुन पथक थांबलेले ठिकाणी आलो. त्यानंतर 17.55 वा शासकीय व्हाईस रेकॉर्डर मध्ये माझे व पंच श्री निकम यांचे निवेदन रेकॉर्ड करण्यात आले. त्यानंतर सदर ठिकाणी आम्हास कारवाईचे अनुशंगाने पोलीस निरीक्षक जाधव यांनी सुचना दिल्या आणि मला व पंच क्रमांक 1 यांना पडताळणीकामी दौंड नगरपरिषद कार्यालय येथे रवाना करणेबाबत ठरविण्यात आले.त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझ्याकडे 18.00 वा चे सुमारास दिला असता तो मी माझ्या पॅन्टच्या पुढील बाजुच्या डाव्या खिश्यामध्ये ठेवला त्यानंतर मला पंच क्र श्री निकम यांचेसह श्री कावळे मुख्यअधिकारी दौंड नगरपरिषद यांच्याकडे पडताळणीकामी दौंड नगरपरिषद येथे माझे वर नमुद खाजगी वाहनाने पाठविले. मी दौंड नगरपरिषद येथे गेलो असता लोकसेवक श्री हावशेट्टे हे रजेवरुन कार्यालयात आले नसल्याचे दिसुन आले.मी व पंच श्री निकम असे लोकसेवक श्री कावळे यांच्या केबीनकडे गेलो असता ते केबीनमध्ये दिसुन आले नाही. म्हणुन मी तेथे कर्मचारी यांना विचारणा केली असता त्यांनी श्री कावळे कार्यालयात येणार नसल्याचे सांगितले.त्यामुळे मी माझ्या मो क्र 7770000055 वरुन श्री लोकसेवक कावळे यांच्या मो क्र 7820905868 यावरती संपर्क केला असता त्यांनी फोन रिसीव्ह केला नाही. .त्यानंतर मी व पंच श्री निकम असे पथक थांबलेल्या ठिकाणी 19.14वा परत आलो. त्यावेळी पोलीस निरीक्षक जाधव यांनी माझेकडे पडताळणी कारवाईकरीता रवाना केल्यापासुन परत येईपर्यन्त घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली असती मी त्यांना वरीलप्रमाणे हकिकत सांगितली. त्यानंतर पोलीस निरीक्षक जाधव यांनी पंच क्र 1 यांचेकडे विचारणा केली असता त्यांनी माझेप्रमाणे मिळतीजुळती हकिकत सांगितली. पोलीस निरीक्षक जाधव यांनी व्हाईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण लॅपटॉपर कॉपी करुन पंच व पथक यांचेसमक्ष ऐकली असता मी व पंच यांनी सांगितलेल्या हकिकतप्रमाणे हकिकत असल्याचे दिसुन आले. पोलीस निरीक्षक जाधव यांनी माझ्याकडे पुढील कारवाईबाबत विचारणा केली असता मी त्यांना लोकसेवक श्री हावशेट्टी हे रजेवरुन कार्यालयात आले नसल्याने ते रजेवरुन कार्यालयात हजर होतील त्या दिवशी पडताळणी कारवाई करण्याची विनंती केली. त्यावेळी सर्वानुमते पुढील कारवाई लोकसेवक श्री हावशेट्टी हे रजेवरुन आल्यानंतर करण्याचे ठरवुन दिनांक 29/01/2025 रोजीची पडताळणी कारवाई तात्पुरती स्थगित करण्यात आली.त्यानंतर पोलीस निरीक्षक जाधव व पथक सदर ठिकाणाहुन ला प्र वि पुणे कार्यालयाकडे 19.25 वा जे दरम्यान रवाना झाले. सदरबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.



पोलीस निरीक्षक
दौंड पोलीस स्टेशन

मी पोलीस निरीक्षक जाधव याना फोन करुन कळविले की,लोकसेवक श्री हावशेट्टे हे दिनांक 05/02/2025 रोजी रजेवरुन हजर होणार आहेत त्यामुळे पुढील पडताळणी दिनांक 05/02/2025 रोजी दुपारी करण्यात यावी. दिनांक 05/02/2025 रोजी 15.50 वा वायरलेस फाटा परिसर या ठिकाणी पोलीस निरीक्षक जाधव पथक व पंच आले . पोलीस निरीक्षक जाधव यानी मला फोन करुन सदरची माहिती दिली असता मी सदर ठिकाणी माझे खाजगी वाहन क्रमांक एम एच 16 बी एम 7799 यामधुन आलो. त्यावेळी मी पोलीस निरीक्षक जाधव यांनी मला पडताळणीकरिता पंच श्री निकम यांच्यासह रवाना होणेबाबत सांगितले असता मी पोलीस निरीक्षक जाधव यांना विनंती केली श्री. पंच निकम यांना सोबत नेहल्यास लोकसेवक श्री कावळे व लोकसेवक श्री हावशेट्टे यांना संशय येण्याची शक्यता असल्यामुळे पंच क्र 1 म्हणुन श्री केळगेंद्रे सोबत देण्यात यावे असे सांगितले.त्यावेळी सर्वानुमते निर्णय घेवुन माझे सोबत पंच क्र 1 म्हणुन श्री केळगद्रे हे देण्याचे ठरविण्यात आले.

त्यावेळी लोकसेवक श्री कावळे मुख्यअधिकारी दौंड नगरपरिषद यांचा लाचेच्या मागणीमध्ये सहभाग आहे किंवा कसे याबाबत पडताळणी करिता दौंड नगरपरिषद कार्यालय येथे मला व पंच क्र 1 श्री केळगद्रे यांना माझ्यासोबत पाठवुन लोकसेवक श्री कावळे यांची माझ्याकडे लाचेची मागणी आहे किंवा कसे याबाबत सर्वानमुते पडताळणी करण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर पोलीस निरीक्षक जाधव यांनी माझे व पंच क्र 1 श्री केळगद्रे यांचे 17.17 वाजे सुमारास निवेदन घेण्यात आले.त्यानंतर सदर ठिकाणी आम्हास कारवाईचे अनुशंगाने पोलीस निरीक्षक जाधव यांनी सुचना दिल्या.

.त्यानंतर 17.23 वाजे सुमारास माझ्याकडे शासकीय व्हाईस रेकॉर्डर चालु करुन दिला असता मी तो माझ्या पॅन्टच्या पुढील बाजुच्या डाव्या खिशात ठेवला.त्यानंतर मला पंच क्र श्री केळगद्रे यांचेसह श्री लोकसेवक श्री कावळे मुख्यअधिकारी दौंड नगरपरिषद यांच्याकडे माझ्या खाजगी वाहनाने पडताळणीकामी पाठविले. मी व पंच श्री केळगद्रे असे दौंड नगरपरिषद कार्यालयात गेले.त्यावेळी लोकसेवक श्री हावशेट्टे हे रजेवरुन कार्यालयात आल्याचे दिसुन आले. मी पंचश्री केळगद्रे यांच्यासह लोकसेवक श्री हावशेट्टे यांना जावुन भेटलो.आणि त्यांना "सर जायच का सीओ साहेबाकड "अशी विचारणा केली असता असता त्यांनी मला साहेबाकडे जावुन या तुम्ही असे सांगितले. त्यानंतर आम्ही सिओ साहेबाचे केबीनकडे गेलो त्यांचे केबीनमध्ये गर्दी असल्याने केबीनचे बाहेर वाट पाहत थांबलो थोडया वेळाने श्री हावशेट्टे तेथे आले त्यावेळी मी त्यांना सिओ यांचे केबीनमध्ये गर्दी मध्ये गर्दी असल्याचे सांगुन "तुम्ही बोलले का साहेबांना अशी विचारणा केली असता त्यांनी " नाही मी ऑनलाईन ऑलरेडी करुन सेन्ड केल त्याच त्यांना दिसत" असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना सिओ साहेबांना भेटलो असता त्यांनी हावशेट्टे साहेब बुधवारी आले की, करु असे बोलले असल्याचे सांगितले असता श्री हावशेट्टे हे चालतय की, असे बोलले त्यावेळी मी त्यांना सिओ साहेबांची अप्रुव की बाबत विचारणा केली असता लोकसेवक श्री हावशेट्टे यांनी "की आताच लावायची नाही की ला अप्रुव्ह केल्यावर की असतो" असे सांगितले.त्यानंतर सिओ यांचे केबीनमध्ये गर्दी असल्याने श्री हावशेट्टे हे परत निघुन गेले काहीवेळाने आम्ही सिओ यांचे केबीनमध्ये गर्दी कमी झाल्याने केबीनमध्ये जावु लागलो त्यावेळी सिओ श्री कावळे हे केबीनचे बाहेर आले.त्यावेळी मी सिओ श्री कावळे यांना माझे अप्रुव राहिले असल्याचे त्यांना सांगितले असता त्यांनी करुन घ्या हावशेट्टे यांचेशी बोलुन घेण्यास सांगितले असता मी त्यांना बोललो श्री हावशेट्टी यांचेशी त्यांनी तुमच्या लॉगईनला असल्याचे सांगितले असता त्यांनी करुन घेतो हावशेट्टे आहेत का अशी विचारणा केली असता मी त्यांना हो आहेत असे सांगितले. त्यानंतर श्री हावशेट्टे तेथे आलेनतर श्री कावळे यांनी त्यांना "विजय यांच काय" अशी विचारणा केली असता श्री हावशेट्टे यांनी तुमच्या लॉगीनला आहे असे सांगितले असता श्री कावळे यांना "उदया करु" असे सांगितले. त्यानंतर श्री कावळे हे बाहेर निघुन गेले

त्यानंतर मी व पंच श्री केळगद्रे असे पथक थांबलेल्या ठिकाणी 19.51 वा परत आलो. त्यावेळी पोलीस निरीक्षक जाधव यांनी माझेकडे पडताळणी कारवाईकरीता रवाना केल्यापासुन परत येईपर्यन्त घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली असती मी त्यांना वरीलप्रमाणे हकिकत सांगितली. त्यानंतर पोलीस निरीक्षक जाधव यांनी पंच क्र 1 यांचेकडे विचारणा केली असता त्यांनी माझेप्रमाणे मिळतीजुळती हकिकत सांगितली. पोलीस निरीक्षक जाधव यांनी व्हाईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण लॅपटॉपर कॉपी करुन पंच व पथक यांचेसमक्ष ऐकली असता मी व पंच यांनी सांगितलेल्या हकिकतप्रमाणे हकिकत असल्याचे दिसुन आले.

पोलीस निरीक्षक जाधव यांनी माझ्याकडे पुढील कारवाईबाबत विचारणा केली असता मी लोकसेवक श्री कावळे यांनी दि.06/02/2025 रोजी भेटणकरीता बोलावले असल्याने पुढील कारवाई दि.06/02/2025 रोजी करण्याची विंनती केली. त्यावेळी पोलीस निरीक्षक जाधव व पंच पथक यांनी पुढील कारवाई दिनांक 06/02/2025 रोजी करण्याचे ठरवुन दिनांक 05/02/2025 रोजीची पडताळणी कारवाई तात्पुरती स्थगित करण्यात आली.त्यानंतर पोलीस निरीक्षक जाधव व पथक सदर ठिकाणाहुन ला प्र वि पुणे कार्यालयाकडे 20.10 वा जे दरम्यान रवाना झाले. सदरबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

दिनांक 06/02/2025 रोजी पडताळणी कारवाईकरीता पोलीस निरीक्षक जाधव,पंच व पथक वायलेस फाटा येथे 15.40 वाजता वायरलेस फाटा परिसर येथे आले. त्यांनी मला फोन करुन पडताळणी कारवाईकरीता आलेबाबत सांगितले त्यानंतर मी माझे खाजगी वाहन क्रमांक एम एच 16 बी एम 7799 याने पथक थांबलेले ठिकाणी आलो. त्यावेळी लोकसेवक श्री कावळे मुख्यअधिकारी दौंड नगरपरिषद यांचा लाचेच्या मागणीमध्ये सहभाग आहे किंवा कसे याबाबत पडताळणी करिता दौंड नगरपरिषद कार्यालय येथे मला व पंच क्र 1 श्री केळगंद्रे यांना माझ्यासोबत पाठवुन लोकसेवक श्री कावळे यांची माझ्याकडे लाचेची मागणी आहे किंवा कसे याबाबत सर्वानुमते पडताळणी करण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर पोलीस निरीक्षक जाधव यांनी माझे व पंच क्र 1 श्री केळगंद्रे यांचे 17.12 वाजे सुमारास निवेदन घेण्यात आले.त्यानंतर सदर ठिकाणी आम्हास कारवाईचे अनुशंगाने पोलीस निरीक्षक जाधव यांनी सुचना दिल्या.मला व पंच क्रमांक 1यांना पडताळणीकामी दौंड नगरपरिषद कार्यालय येथे माझे खाजगी वाहनाने रवाना करणेबाबत ठरविण्यात आले.त्यानंतर 17.18 वा शासकीय व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझ्याकडे दिला असता तो मी माझ्या पॅन्टच्या पुढील बाजुच्या डाव्या खिश्यामध्ये ठेवला त्यानंतर मला पंच क्र 1 यांचेसह श्री लोकसेवक श्री कावळे व श्री हावशेट्टे यांच्याकडे पडताळणीकामी माझे वर नमुद खाजगी वाहनाने पाठविले. मी पंच क्र 1 यांचेसह दौंड नगरपरिषद कार्यालय येथे माझे वर नमुद खाजगी वाहनाने जावुन कार्यालयात पाहिले असता श्री कावळे हे मिटींगमध्ये व्यस्त असल्याने त्यांची वाट पाहीली काही वेळाने ते मिटींग हॉलमधुन बाहेर आले.त्यावेळी त्यांनी मला बॉन्ड पेपरवरती मुळ मालकाचे सहया करुन घ्या असे सांगितले असता मी त्यांना श्री हावशेट्टे यांना तस सांगितल आहे का अशी विचारणा केली असता त्यांनी त्याची आवश्यकता नाही बिकोज यु आर टेकन दॅट लॅन्ड ऑन द लिज व्हॉट काईड ऑफ डाक्युमेंट अ○नी काईड ऑफ प्लॉट इज देअर आय व्हील टेक सिगनेचर अशी विचारणा माझेकडे केली असता मी त्यांनी पॉवर ऑफ अ○टर्नी दिली ना सर त्याची कॉपी असे सांगितले त्यावेळी त्यांनी मुळ मालक यांना बॉन्ड पेपरसहित नगरपरिषद कार्यालयातु घेवुन या असे मला सांगितले त्यानंतर मी श्री हावशेट्टे यांना जावुन भेटलो आणि बॉन्ड पेपरवर नमुद करायचा फॉरमॅट याबाबत विचारणा केली असता त्यांनी त्यांचेकडील अन्य प्रकरणातील बॉन्ड पेपर दाखविला त्याप्रमाणे मुळमालकाचा बॉन्ड पेपर आणणेबाबत सांगितले.
त्यानंतर मी व पंच श्री केळगंद्रे असे पथक थांबलेल्या ठिकाणी 18.42वा परत आलो. त्यावेळी पोलीस निरीक्षक जाधव यांनी माझेकडे पडताळणी कारवाईकरीता रवाना केल्यापासुन परत येईपर्यन्त घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली असती मी त्यांना वरीलप्रमाणे हकिकत सांगितली. त्यानंतर पोलीस निरीक्षक जाधव यांनी पंच क्र 1 यांचेकडे विचारणा केली असता त्यांनी माझेप्रमाणे मिळतीजुळती हकिकत सांगितली. पोलीस निरीक्षक जाधव यांनी व्हाईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण लॅपटॉपवर कॉपी करुन पंच व पथक यांचेसमक्ष ऐकली असता मी व पंच यांनी सांगितलेल्या हकिकतप्रमाणे हकिकत असल्याचे दिसुन आले.
पोलीस निरीक्षक जाधव यांनी माझ्याकडे पुढील कारवाईबाबत विचारणा केली असता मी त्यांना लोकसेवक श्री कावळे यांनी मला कराराचे कागदपत्राबाबत विचारणा केली असता मी त्यांनी कागदपत्रे सादर केली असल्याचे सांगुन देतील त्यांनी मुळमालकास बॉन्ड पेपरसह उदया घेवुन कार्यालयात विनाकारण बोलावले आहे. त्यामुळे पुढील पडताळणी दि.07/02/2025 रोजी करण्यात यावी अशी विंनती केली. त्यावेळी पोलीस निरीक्षक जाधव व पंच पथक यांनी पुढील कारवाई दिनांक 07/02/2025 रोजी करण्याचे ठरवुन दिनांक 06/02/2025 रोजीची पडताळणी कारवाई तात्पुरती स्थगित करण्यात आली.त्यानंतर पोलीस निरीक्षक जाधव व पथक सदर ठिकाणाहुन ला प्र वि पुणे कार्यालयाकडे 19.11 वा जे दरम्यान रवाना झाले. सदरबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.
दि.06/02/2025 रोजी रात्री 22.00 वाजणेच्या सुमारास श्री हावशेट्टी हे मला मी राहत असलेल्या देवपाम सोसायटी दौंड येथे भेटले. त्यावेळी श्री हावशेट्टे यांनी बोलण्याआधी माझा मोबाईल घेवुन चेक केला. त्यानंतर त्यांनी मला "तुमचे वर्तणुक संशयास्पद होते. तुम्ही मागे मला फोन करुन चलनाची रक्कम याबाबत वारंवार फोन करुन विचारणा केली होती. त्यामुळे मला संशय आला मी माझे परिचयातील काही लोकांना विचारणा केली असता त्यांनी आपण मला दि.14/01/2025 रोजी भेटला त्यावेळी असलेली स्थिती हि एसीबीच्या कारवाईशी मिळतीजुळती असल्याचे दिसुन आल्याने मला संशय आल्याने मी टेन्शममध्ये मेडिकल रजेवर पंधरा दिवस गावी निघुन गेलो होतो" असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना "मी असे काही केले नाही तुमचा गैरसमज झाला आहे "असे सांगितले असता त्यांनी दि.07/02/2025 रोजी लोकसेवक श्री कावळे यांना भेटणेकरीता दौंड नगरपरिषद कार्यालयात या असे सांगितले.
दिनांक 07/02/2025 रोजी 11.10 वा वायरलेस फाटा परिसर या ठिकाणी पोलीस निरीक्षक जाधव पथक व पंच आले . पोलीस निरीक्षक जाधव यांनी मला फोन करुन सदरची माहिती दिली असता मी सदर ठिकाणी माझे खाजगी वाहन क्रमांक एम एच 16 बी एम 7799 यामधुन आलो. त्यावेळी पोलीस निरीक्षक जाधव यांना मी दोन्ही पंच व



पोलीस निरीक्षक
दौंड पोलीस स्टेशन

पथक यांचेसमक्ष दि.06/02/2025 रोजी रात्री 22.00 वा देवपाम सोसायटी दौंड येथे लोकसेवक श्री हावशेट्टे हे मला भेटले आणि त्यांनी माझेसोबत वरीलप्रमाणेबोलणे केल्याची माहिती दिली.त्यावेळी पोलीस निरीक्षक जाधव यांनी मला लोकसेवक श्री हावशेट्टे यांना कारवाईचे आलेले संशयाबाबत विचारणा केली असता मी त्यांना लोकसेवक श्री हावशेट्टे याना दि.14/01/2025 रोजी केलेल्या कारवाईचा संशय आला होता म्हणुन ते रजेवर गेले होते. मी लोकसेवक श्री हावशेट्टे याना त्याचा गैरसमज झाला आहे अशी खात्री करुन दिली त्यामुळे लोकसेवक श्री हावशेट्टे यांनी आज रोजी लोकसेवक श्री कावळे यांना भेटणेकरीता बोलावले असल्याचे सांगितले.
त्यावेळी लोकसेवक श्री कावळे मुख्यअधिकारी दौंड नगरपरिषद यांचा लाचेच्या मागणीमध्ये सहभाग आहे किंवा कसे याबाबत पडताळणी करिता दौंड नगरपरिषद कार्यालय येथे मला व पंच क्र 1 श्री केळगद्रे यांना माझ्यासोबत पाठवुन लोकसेवक श्री कावळे यांची माझ्याकडे लाचेची मागणी आहे किंवा कसे याबाबत सर्वानुमते पडताळणी करण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर पोलीस निरीक्षक जाधव यांनी माझे व पंच क्र 1 श्री केळगद्रे यांचे 12.21 वाजे सुमारास निवेदन घेण्यात आले.त्यानंतर सदर ठिकाणी आम्हास कारवाईचे अनुशंगाने पोलीस निरीक्षक जाधव यांनी सुचना दिल्या.

.त्यानंतर 12.29 वाजे सुमारास माझ्याकडे शासकीय व्हाईस रेकॉर्डर चालु करुन दिला असता मी तो माझ्या पॅन्टच्या पुढील बाजुच्या डाव्या खिशात ठेवला.त्यानंतर मला पंच क्र श्री केळगद्रे यांचेसह श्री लोकसेवक श्री कावळे मुख्यअधिकारी दौंड नगरपरिषद यांच्याकडे माझ्या खाजगी वाहनाने पडताळणीकामी पाठविले. मी व पंच श्री केळगद्रे असे दौड नगरपरिषद कार्यालयात जात असताना वाटेत जमीनीचे मुळमालक यांचा मुलगा हरिष यांना वाहनात घेवुन कार्यालयात गेलो. मी ,पंच क्र 1 व श्री हरिष असे तेथे श्री कावळे यांच्या केबीनकडे गेलो असता तेथील कर्मचारी यांनी मला ते आले नसल्याचे सांगितले.त्यामुळे आम्ही हावशेट्टे यांची भेट घेतली असता त्यांनी मला प्रतिज्ञापत्र सादर करणेबाबत सांगितले.त्यानंतर हावशेट्टे यांचेबरोबर कामाबाबत बोलणे झाले त्यानंतर मी व पंच श्री केळगद्रे असे पथक थांबलेल्या ठिकाणी 14.00 वा परत आलो. त्यावेळी पोलीस निरीक्षक जाधव यांनी माझेकडे पडताळणी कारवाईकरीता रवाना केल्यापासुन परत येईपर्यन्त घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली असती मी त्यांना वरीलप्रमाणे हकिकत सांगितली. त्यानंतर पोलीस निरीक्षक जाधव यांनी पंच क्र 1 यांचेकडे विचारणा केली असता त्यांनी माझेप्रमाणे मिळतीजुळती हकिकत सांगितली. पोलीस निरीक्षक जाधव यांनी व्हाईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण लॅपटॉपवर कॉपी करुन पंच व पथक यांचेसमक्ष ऐकली असता मी व पंच यांनी सांगितलेल्या हकिकतप्रमाणे हकिकत असल्याचे दिसुन आले.
पोलीस निरीक्षक जाधव यांनी माझ्याकडे पुढील कारवाईबाबत विचारणा केली असता मी त्यांना लोकसेवक श्री कावळे हे कार्यालयात हजर नव्हते यावरुन त्यांचे एकदंरीत वर्तनावरुन लोकसेवक श्री कावळे हे मला भेटण्यास टाळाटाळ करुन माझे काम प्रलिंबत ठेवत आहे. यामागे त्यांची लाच मागणेचा उदेश असावा त्यामुळे श्री कावळे मला संर्पक करुन कार्यालयात बोलावुन लाच मागण्याची शक्यता आहे.त्यामुळे लोकसेवक श्री कावळे किंवा लोकसेवक श्री हावशेट्टे मला संर्पक करुन बोलावतील त्यावेळी पुढील पडताळणी करणेत यावी अशी विंनती केली. त्यावेळी पोलीस निरीक्षक जाधव व पंच पथक यांनी पुढील कारवाई मला लोकसेवक यांनी कार्यालयात बोलावलेनंतर करण्याचे सर्वानुमते ठरवुन दिनांक 07/02/2025 रोजीची पडताळणी कारवाई तात्पुरती स्थगित करण्यात आली. त्यानंतर पोलीस निरीक्षक जाधव व पथक सदर ठिकाणाहुन ला प्र वि पुणे कार्यालयाकडे 17.00 वा जे दरम्यान रवाना झाले. सदरबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.
त्यानंतर मी लोकसेवक श्री हावशेट्टे यांचे फोनची वाट पाहिली असता मला त्यांचा फोन आला नाही. परंतु मी माझे वर नमुद ले आउट मंजुरीचे कामाबाबत ऑनलाईन पाहणी केली असता माझे वर नमुद कामाची फाईल हि सिओ इंदापुर यांचेकडे पाठविली असल्याचे दिसुन आले.वस्तुस्थ: माझे काम मंजुरी करण्याचे अधिकार लोकसेवक श्री कावळे ,मुख्याधिकारी,दौंड नगरपरिषद यांना असताना माझे वर नमुद काम मंजुरीकरीता सिओ इंदापुर यांचेकडे ऑनलाईन पाठविली असल्याने त्याबाबत मी विचारणा करण्याकरीता लोकसेवक श्री हावशेट्टे यांना विचारणा केली असता त्यांनी लोकसेवक श्री कावळे यांना येवुन भेटणेबाबत मला सांगितले. परंतु त्यावेळी लोकसेवक श्री कावळे हे स्पोर्ट व इतर कामाजाकरीता बाहेर होते.दि.20/02/2025 रोजी श्री लोकसेवक हावशेट्टे मला भेटले असता त्यांनी लोकसेवक श्री कावळे यांना दि.21/02/2025 रोजी दौंड नगरपरिषद कार्यालयात येवुन भेटा असे सांगितले.
सदरची माहिती मी पोलीस निरीक्षक जाधव यांना दिली
दिनांक 21/02/2025 रोजी वायरलेस फाटा परिसर या ठिकाणी पोलीस निरीक्षक जाधव पथक व पंच आले . पोलीस निरीक्षक जाधव यांनी मला फोन करुन सदरची माहिती दिली असता मी सदर ठिकाणी माझे खाजगी वाहन क्रमांक एम एच 16 बी एम 7799 यामधुन 17.15 वा आलो. त्यावेळी मी पोलीस निरीक्षक जाधव पंच व पथक यांना वरीलप्रमाणे झालेले घटना सांगितली.

त्यावेळी लोकसेवक श्री कावळे मुख्यअधिकारी दौंड नगरपरिषद यांना लाचेच्या मागणीमध्ये सहभाग आहे किंवा कसे याबाबत पडताळणी करिता दौंड नगरपरिषद कार्यालय येथे मला व पंच क्र 1 श्री केळगंद्रे यांना माझ्यासोबत पाठवुन लोकसेवक श्री कावळे यांची माझ्याकडे लाचेची मागणी आहे किंवा कसे याबाबत सर्वानुमते पडताळणी करण्याचे ठरविण्यात आले.त्यावेळी एक नवीन सिलपॅक मेमरीकार्ड पोलीस निरीक्षक जाधव यांनी आम्हारा दाखवुन त्यातील वेष्टनातुन एक मेमरीकार्ड काढुन मला,पंच व पथक यांना दाखवुन त्याचे वर्णन नोंद करुन घेतले.त्यानतर सदरचे मेमरीकार्ड शासकिय व्हाईस रेकॉर्डरमध्ये इनस्र्ट करुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन त्यामध्ये माझे व पंच क्र 1 श्री केळगद्रे यांचे 17.45 वाजे सुमारास निवेदन घेण्यात आले.त्यानंतर सदर ठिकाणी आम्हास कारवाईचे अनुशंगाने पोलीस निरीक्षक जाधव यांनी सुचना दिल्या.

.त्यानतर 17.52 वाजे सुमारास माझ्याकडे शासकीय व्हाईस रेकॉर्डर चालु करुन दिला असता मी तो माझ्या पॅन्टच्या पुढील बाजुच्या डाव्या खिशात ठेवला.त्यानंतर मला पंच क्र श्री केळगद्रे यांचेसह श्री लोकसेवक श्री कावळे मुख्यअधिकारी दौंड नगरपरिषद यांच्याकडे माझ्या वर नमुद खाजगी वाहनाने पडताळणीकामी पाठविले. मी व पंच श्री केळगंद्रे असे माझे वाहनाने दौंड नगरपरिषद कार्यालयाकडे निघालो त्यावेळी लोकसेवक श्री हावशेट्टे यांचे मोबाईल क्रमांक 9403143362 यावर माझे मोबाईल क्रमांक 7770000055 यावरुन संपर्क साधला असता हावशेट्टे यांना दौंड नगरपरिषद कार्यालयाकडे येत असल्याचे सं◌ागितले त्यावेळी लोकसेवक श्री हावशेट्टी यांनी देवपाम सोसायटीकडे जात असल्याचे सांगितले.आम्ही दौंड नगरपरिषद कार्यालयाजवळ पोहचलो असता लोकसेवक श्री हावशेट्टे यांनी त्याचे मोबाईल क्रमांक 9403143362 यावरुन माझे मोबाईल क्रमांक 7770000055 यावर व्हाटस्प मेसेज केला त्यामध्ये त्यांनी नगरपालिकेत येवु नका नंतर फोन करतो असा संदेश पाठविला होता. नमुद मेसज मी पाहत असतानाच लोकसेवक श्री हावशेट्टे हे त्याचे चारचाकी वाहनातुन आमचे वाहनापाशी आले व त्यांनी नंतर फोन करतो असे मला इशाराने सांगुन तेथुन त्याचे वाहनातुन निघुन गेले. आम्ही दौंड नगरपरिषद कार्यालय येथे जावुन लोकसेवक श्री कावळे यांचेबाबत विचारणा केली असता तेथील कर्मचारी यांनी लोकसेवक श्री कावळे हे कार्यालयात आले नाहित आणि येणार नसल्याचे सांगितले.

त्यानंतर मी व पंच श्री केळगद्रे असे पथक थांबलेल्या ठिकाणी 18.56 वा परत आलो. त्यावेळी पोलीस निरीक्षक जाधव यांनी माझेकडे पडताळणी कारवाईकरीता रवाना केल्यापासुन परत येईपर्यन्त घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली असती मी त्यांना वरीलप्रमाणे हकिकत सांगितली. त्यानंतर पोलीस निरीक्षक जाधव यांनी पंच क्र 1 यांचेकडे विचारणा केली असता त्यांनी माझेप्रमाणे मिळतीजुळती हकिकत सांगितली. पोलीस निरीक्षक जाधव यांनी व्हाईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण लॅपटॉपर कॉपी करुन पंच व पथक यांचेसमक्ष ऐकली असता मी व पंच यांनी सांगितलेल्या हकिकतप्रमाणे हकिकत असल्याचे दिसुन आले.

पोलीस निरीक्षक जाधव यांनी माझ्याकडे पुढील कारवाईबाबत विचारणा केली असता मी त्यांना आज रोजी पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक श्री हावशेट्टे यांनी फोन करतो असे सांगितले आहे.त्यामुळे त्यांचा फोन आलेनंतर कळवितो त्यावेळी पुढील कारवाई करण्यात यावी अशी विंनती केली. त्यावेळी पोलीस निरीक्षक जाधव व पंच पथक यांनी पुढील कारवाई मला लोकसेवक हावशेट्टे यांनी फोन करुन बोलावलेनंतर करण्याचे सर्वानुमते ठरवुन दिनांक 21/02/2025 रोजीची पडताळणी कारवाई तात्पुरती स्थगित करण्यात आली.त्यानंतर पोलीस निरीक्षक जाधव व पथक सदर ठिकाणाहुन ला प्र वि पुणे कार्यालयाकडे 19.30 वा जे दरम्यान रवाना झाले. सदरबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे

मी दिनांक 16/04/2025 रोजी लोकसेवक श्री हावशेट्टे मला देवपाम सोसीयटी दौंड येथे भेटले त्यावेळी त्यांनी माझी टेन्टीट्युव्ह ले आउट मंजुरीची फाईल सिटी सर्वे ऑफिसला पाठविली होती.सदर फाईल सिटी सर्वे ऑफिसमधुन दौंड नगरपरिषद कार्यलयात आली आहे.त्यामुळे दिनांक 17/04/2025 रोजी दौंड नगरपरिषद कार्यालयात येवुन भेटा असे मला सांगितले.मी पोलीस निरीक्षक जाधव यांना संपर्क करुन सदरची माहीती दिली. आणि त्यांना दिनांक 17/04/2025 रोजी दौंड नगरपरिषद कार्यालयात जावुन श्री हावशेट्टे श्री कावळे यांना भेटणार आहे.त्यावेळी पडताळणी कारवाई करणेबाबत विनंती केली.दिनांक 17/04/2025 रोजी 10.30 वा पोलीस निरीक्षक जाधव पंच पथक हे पाटस या ठिकाणी आले आणि मला संपर्क करुन कळविले .त्यानंतर मी रहात असलेल्या देवपाम सोसयटी दौंड येथुन पथक थांबलेल्या ठिकाणी जाणेकरीता निघत असताना मला सदर सोसयटीमध्ये रहाणारे लोकसेवक श्री हावशेट्टे हे त्यांच्या वाहनातुन जाताना दिसले.त्यांनी मला पाहुन त्यांचे चारचाकी वाहन थांबवले.मी त्यांना माझ्या कामाबाबत विचारणा केली असता त्यांनी तुम्ही फाईलबाबत बोलता, पैश्याबाबत बोलत नाही असे सांगितले त्यावेळी मी हावशेट्टे यांना श्री कावळे यांच्या लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता श्री हावशेट्टे यांनी मला दिनांक 24/04/2025 रोजी मुख्यअधिकारी दौडनगरपरिषद श्री कावळे यांची भेट घालुन देतो त्यावेळी त्याची लाचेची रक्कमेबाबत समक्ष बोलणी करा असे सांगितले.त्यानंतर श्री हावशेट्टे त्याच्या



पोलीस निरीक्षक
दौंड पोलीस स्टेशन

वाहनातुन निघुन गेले. मी सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी जावुन सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक जाधव पथक व पंच यांना सदरची माहीती दिली. त्यावेळी पडताळणी कारवाई दिनांक 24/04/2025 रोजी ठरविण्यात आले.
दिनांक 23/04/2025 रोजी 18.00 वा मी माझ्या वैयक्तीक कामाकरिता मुंबई येथे असताना श्री हावशेट्टे यांनी त्याचे मो क्र 9403143362 यावरुन माझे मो क्र 7770000055 यावर व्हॉटसअप कॉल करुन लाचेची रक्कम घेवुन दौंड नगरपरिषद कार्यालयात तात्काळ बोलविले.त्यावेळी त्यांना मुंबई येथे असल्याचे सांगितले असता त्यांनी पुन्हा पुन्हा व्हॉटसअप कॉल करुन तात्काळ मागितलेली लाच रक्कम घेवुन दौंड नगरपरिषद कार्यालयात लोकसेवक श्री कावळे यांनी बोलविले असल्याचे सांगितले.त्यावेळी मी त्यांना मुंबई येथे असल्याचे सांगुन तात्काळ दौंड नगरपरिषद कार्यालयात येवु शकत नसुन दि.24/04/2025 रोजी दौंड नगरपरिषद येथील कार्यालयात येत असल्याचे सांगितले.सदरची माहिती आम्ही पोलीस निरीक्षक जाधव यांना देवुन पुढील कारवाईकरीता दि. 24/04/2025 रोजी वायरेलस फाटा दौंड येथे येणेबाबत सांगितले.
दिनांक 24/04/2025 रोजी पडताळणी कारवाईकरीता पोलीस निरीक्षक जाधव,पंच व पथक आले त्यांनी मला फोन करुन कारवाईकरीता आलेबाबत सांगितले.त्यानंतर मी माझे खाजगी वाहन क्रमांक एम एच 16 बी एम 7799 याने पथक थांबलेले ठिकाणी 16.00 वा आलो. पोलीस निरीक्षक जाधव व दोन्ही पंच यांना वरीलप्रमाणे लोकसेवक श्री हावशेट्टी यंाचेबरोबर दि.23/04/2025 रोजी झालेले बोलणे याबाबत थोडक्यात सांगितले.त्यावेळी पोलीस निरीक्षक जाधव यांनी मला लोकसेवक श्री हावशेट्टे यांनी लाच रक्कम घेवुन या असे दि.23/04/2025 रोजी फोन करुन सांगितले असल्याने त्यांनी मागितलेली लाच रक्कम घेवुन पुढील कारवाईकरीता जाणेबाबत विचारणा केली असता मी त्यांना नमुद लाच मागणीमध्ये लोकसेवक श्री कावळे यांचा सहभाग आहे किंवा कसे याची खात्री करणेकरीता लोकसेवक श्री कावळे यांना जावुन भेटुन प्रथम बोलणे करतो त्यानंतर सापळा कारवाई करण्यात यावी अशी विंनती केली.त्यावेळी पोलीस निरीक्षक श्री जाधव यांनी पथक,पंच यांचेशी चर्चा केली. त्यावेळी लोकसेवक श्री कावळे मुख्यअधिकारी दौंड नगरपरिषद यांचा लाचेच्या मागणीमध्ये सहभाग आहे किंवा कसे याबाबत पडताळणी करिता दौंड नगरपरिषद कार्यालय येथे मला व पंच क्र 1 श्री केळगद्रे यांना माझ्यासोबत पाठवुन लोकसेवक श्री कावळे यांची माझ्याकडे लाचेची मागणी आहे किंवा कसे याबाबत सर्वानुमते पडताळणी करण्याचे ठरविण्यात आले.त्यानंतर मेमरीकार्ड व्हाईस रेकॉर्डर इन्सर्ट करुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन त्यामध्ये माझे व पंच क्र 1 श्री केळगद्रे यांचे 16.15 वाजे सुमारास निवेदन घेण्यात आले.त्यानंतर सदर ठिकाणी आम्हास कारवाईचे अनुशंगाने पोलीस निरीक्षक जाधव यांनी सुचना दिल्या.
त्यानंतर 16.27 वाजे सुमारास माझ्याकडे शासकीय व्हाईस रेकॉर्डर चालु करुन दिला असता मी तो माझ्या पॅन्टच्या पुढील बाजुच्या डाव्या खिशात ठेवला.त्यानंतर मला पंच क्र श्री केळगद्रे यांचेसह श्री लोकसेवक श्री कावळे मुख्यअधिकारी दौंड नगरपरिषद यांच्याकडे माझ्या वर नमुद खाजगी वाहनाने पडताळणीकामी पाठविले. मी व पंच श्री केळगंद्रे असे माझे वाहनाने दौंड नगरपरिषद कार्यालयाकडे गेलो. मी व पंच श्री केळगंद्रे असे मुख्यदंडाधिकारी दौंड नगरपरिषद कार्यालयात गेलो त्यावेळी तेथे गे्ल्यावर लोकसेवक श्री कावळे कार्यालयात उपस्थितीत नव्हते. त्यावेळी मी कार्यलयातील इतर कर्मचारी यांच्याकडे लोकसेवक श्री कावळे आहेत का याबाबत विचारणा केली असता .कर्मचारी यांनी लोकसेवक श्री कावळे यांची बंदली झाली आहे असे सांगितले. मी कधी बदली झाली असे विचारले असता कर्मचारी याने काल झाली असे मला सांगितले. त्यानंतर मी कार्यलयातील इतर कर्मचारी यांच्याकडे लोकसेवक हावशेट्ट साहेब आहेत का अशी विचारणा केली असता त्यांनी लोकसेवक श्री हावशेट्ट कार्यालयात हजर नसुन बाहेर गेले असल्याचे सांगितले.त्यानंतर मी माझ्या मोबाईलवर क्रमांक 7770000055 यावरुन लोकसेवक श्री हावशेट्ट यांचे मोबाईल क्रमांक 9403143362 यावरती व्हॉटसअप कॉल करुन सी ओ साहेब ऑफिसला येणारत की नाही असे विचारले . त्यावेळी लोकसेवक श्री हावशेट्ट नाही नाही साहेबांना चेंज केले असे सांगितले. त्यांनंतर मी साहेब येणार ये का नाहीत इकड अशी विचारणा केली असता लोकसेवक श्री हावशेट्ट यांनी नाही, नाही आज ऑफिसला तर नाहीच येणार ,कालपर्यतच चार्ज होता असे सांगितले त्यावेळी मी त्यांना त्यामुळे येणार नाहित का अशी विचारणा लोकसेवक श्री हावशेट्टी यांना केली असता त्यांनी हा असे सांगितले.
त्यानंतर मी व पंच श्री केळगद्रे असे पथक थांबलेल्या ठिकाणी 17.07 वा परत आलो. त्यावेळी पोलीस निरीक्षक जाधव यांनी माझेकडे पडताळणी कारवाईकरीता रवाना केल्यापासुन परत येईपर्यन्त घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली असती मी त्यांना वरीलप्रमाणे हकिकत सांगितली. त्यानंतर पोलीस निरीक्षक जाधव यांनी पंच क्र 1 यांचेकडे विचारणा केली असता त्यांनी माझेप्रमाणे मिळतीजुळती हकिकत सांगितली. पोलीस निरीक्षक जाधव यांनी व्हाईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण लॅपटॉपर कॉपी करुन पंच व पथक यांचेसमक्ष ऐकली असता मी व पंच यांनी सांगितलेल्या हकिकतप्रमाणे हकिकत असल्याचे दिसुन आले.
पोलीस निरीक्षक जाधव यांनी माझ्याकडे पुढील कारवाईबाबत विचारणा केली असता मी त्यांना सायंकाळी

लोकसेवक श्री हावशेट्टी फोन करण्याची शक्यता आहे त्यामुळे त्यांचा फोन आलेनंतर पुढील कारवाई करणेत यावी
अशी विंनती केली असता सर्वानुमते लोकसेवक श्री हावशेट्टी यांचा फोन आल्यानंतर पुढील कारवाई करण्याचे
ठरविण्यात आले.त्यानंतर मी माझे वैयत्कीक कामाकरीता मी राहत असलेल्या देवपाम सोसायटी येथे गेलो होतो
त्यावेळी मला लोकसेवक श्री हावशेट्टे हे बिल्डींगचे पार्कीगमध्ये भेटले त्यांनी मला लोकसेवक श्री कावळे
मुख्याधिकारी यांची बदली झाली असुन त्यांनी दौंड मुख्याधिकारी पदाचा चार्ज सोडला आहे त्यामुळ त्यांच जागी
नवीन मुख्याधिकारी हे येणार असुन त्यांचे ले आउट मंजुरीचे कामाबाबत काय म्हणणे आहे हे जाणुन घेतल्यांनतर
फोन करतो त्यावेळी पैसे घेवुन या असे सांगितले.त्यानंतर मी सापळा पथक थाबलेल्या ठिकाणी येवुन पंचासमक्ष
पोलीस निरीक्षक जाधव व पथक यांना माहिती दिली.
त्यावेळी पोलीस निरीक्षक जाधव यांनी मला पुढील कारवाईबाबत विचारणा केली असता मी त्यांना लोकसेवक श्री
हावशेट्टे हे मागितलेली लाच रक्कम घेवुन येण्याबाबत फोन करुन कळवतील त्यावेळी पुढील कारवाई करण्यात यावी
अशी विंनती केली त्यावेळी पोलीस निरीक्षक जाधव यांनी सर्वाची चर्चा केली आणि सर्वानुमते लोकसेवक श्री हावशेट्टे
यांचा मला फोन आलेनंतर पुढील कारवाई करण्याचे ठरविण्यात आले.दिनांक 24/04/2025 रोजीची पडताळणी
कारवाई तात्पुरती स्थगित करण्यात आली.त्यानंतर पोलीस निरीक्षक जाधव व पथक सदर ठिकाणाहुन ला प्र वि पुणे
कार्यालयाकडे 19.45 वा जे दरम्यान रवाना झाले. सदरबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे
दिनांक 28/04/2025 रोजी मी पोलीस निरीक्षक जाधव यांना फोन करुन कळविले की, लोकसेवक हावशेट्टी हे
देवपाम सोसायटी येथे भेटले होते त्यांनी दि.29/04/2025 रोजी मागितलेली लाच रक्कम घेवुन भेटणेकरीता
बोलवले आहे.त्यावेळी पोलीस निरीक्षक जाधव यांनी माझेकडे पुढील कारवाईबाबत विचारणा केली असता मी त्यांना
श्री कावळे यांची दौंड नगरपरिषद येथुन बदली झाल्याने त्यांनी दौंड नगरपरिषद येथील चार्ज सोडला आहे तसेच
लोकसेवक श्री हावशेट्टे यांनी मला दि.29/04/2025 रोजी त्यांनी मागितलेली लाच रक्कम घेवुन भेटणेकरीता
बोलावले आहे.त्यामुळे मी दि.29/04/2025 रोजी लोकसेवक श्री हावशेट्टी यांना लाच रक्कम देण्यास जाणार आहे
त्यावेळी पुढील कारवाई करावी.
पोलीस निरीक्षक जाधव ,पंच व पथक हे दिनांक 29/04/2025 रोजी 12.00 वाजणेचे सुमारास आले.त्यानंतर
त्यांनी मला संपर्क करुन माहीती दिली असता मी माझे खाजगी वाहन क्रमांक एम एच 16 बी एम 7799 याने पथक
थांबलेले ठिकाणी 12.35 वा आलो.पोलीस निरीक्षक जाधव यांनी नव्याने पथकात सामील केलेले पोलीस शिपाई
दिवेकर यांची ओळख करुन दिली तसेच मागील पंच श्री केंळगेद्रे यांनी त्यांचे वैयक्तीक कारणास्तव त्यांच्याऐवजी
अन्य पंच घेणेबाबत विंनती केल्याने पंच श्री केंळगेद्रे यांचे ऐवजी त्यांच्या कार्यालयाने पंच म्हणुन श्री माधव वाघमारे
यांना पाठविलेबाबतची माहीती पोलीस निरीक्षक जाधव यांनी देवुन पंच श्री वाघमारे यांची ओळख करुन दिली.
त्यावेळी पोलीस निरीक्षक जाधव यांनी माझेकडे विचारणा केली असता मी त्यांना लोकसेवक श्री हावशेट्टी यांनी
मागितलेली लाच रक्कम देणेकरीता आज रोजी जाणार आहे परंतु माझेकडे सध्या 35,000 रुपये असल्याचे
सांगितले.त्यावेळी मला उपल्बध असलेली लाच रक्कम हजर करणेस सांगितले असता मी माझेकडे उपलब्ध
असलेल्या 500 रुपयाच्या चलनाच्या एकुण 70 नोटा अशी एकुण रक्कम 35,000 हजार रुपये सादर केली.
त्यावेळी त्यामध्ये 500 रुपयांचे नोटाप्रमाणे दिसणारे खेळण्यातील 200 नकली नोटा वापरण्याचे सर्वानुमते
ठरविण्यात येवुन नमुद खेळण्यातील नोटा लाच रकमेमध्ये सामाविष्ठ करण्यात आल्या. पोलीस निरीक्षक जाधव यांचे
सुचनेनुसार महिला पोलीस शिपाई माकर यांनी पच क्र 2 यांचे मदतीने मी सादर केलेल्या नोंटांचे नंबर लिहुन घेतले.
त्यानंतर पोलीस निरीक्षक जाधव यांनी त्यांचेकडील सनडिस्क कंपनीचे नवीन सिलबंद कार्ड त्यांच्या वेस्टानातुन
बाहेर काढुन त्याचे वर्णन  नोंद करुन सदर मेमरी कार्ड शासकीय व्हाईस रेकॉर्डमध्ये इनसर्ट केले. पोलीस निरीक्षक
जाधव यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझे आणि पंचाचे निवदेन 13.30 वा रेकॉर्ड केले.त्यांनतर अॅन्थ्रोसीन
पावडर यांचे गुणधर्म महिला पोलीस शिपाई माकर यांनी मला व पंचाना समजुन सांगितले. मी सादर केलेली रक्कम
आणि खेळण्यातील डमी नोटा यांना अॅन्थ्रोसीन पावडर महिला पोलीस शिपाई माकर यांनी लावुन नमुद नोंटा
त्यांनी माझे पॅन्टच्या पुढील बाजुचे उजव्या खिशात ठेवल्या.पोलीस निरीक्षक जाधव यांनी योग्य त्या सुचना देवुन
लोकसेवक श्री हावशेट्टी यांनी लाच रक्कम स्विकारल्यांनतर डोळयांना परिधान केलेला चष्मा काढुन इशारा करावा
असे सांगितले.त्यांनतर व्हाईस रेकॉर्डर पोलीस निरीक्षक जाधव यांनी चालु करुन दिला तो मी पॅन्टच्या पुढील बाजुचे
डाव्या खिशात ठेवला ती वेळ 14.16 अशी होती.
त्यानंतर लोकसेवक श्री हावशेट्टे यांनी मागितलेली लाच रक्कम देणेकरिता पंच श्री वाघमारे यांच्यासह दौंड
नगरपरिषद कार्यालय या ठिकाणी माझ्या वर नमुद खाजगी वाहनाने रवाना केले.माझ्या पाठोपाठ पोलीस निरीक्षक
जाधव व पथक पंच क्र 2 असे शासकीय वाहनातुन आले.मी दौंड नगरपरिषद कार्यालयाच्या समोरील रस्त्याच्या
बाजुला 14.34 वा वाहन पार्क करुन चालत पंच वाघमारे यांच्यासह कार्यालयात गेलो.माझ्या पाठोपाठ पथक आले.



निरीक्षक

आणि कार्यालयात फिरवुन थांबले.मी कार्यालयात पाहीले असता लोकसेवक श्री हावशेट्टे हे दिसुन आले नाही म्हणुन कोणता इशारा न करता मी माझ्या वाहनात बसुन लोकसेवक श्री हावशेट्टी यांना संपर्क केला असता ते जेवणाकरिता बाहेर आल्याचे सांगितले.त्यानंतर मी पोलीस निरीक्षक जाधव यांना इशारा करुन माझ्या वाहनात बसण्यास सांगितले. पोलीस निरीक्षक जाधव यांनी माझ्या वाहनात बसुन माझ्याकडील व्हाईस रेकॉर्डर काढुन तो 15.00 वा बंद केला.त्यानंतर मी पोलीस निरीक्षक जाधव यांना वरीलप्रमाणे हकीकत सांगितली.अर्ध्या तासाने मी लोकसेवक श्री हावशेट्टे यांना 15.32 व्हॅाटसअप कॉल केला असता त्यांनी तो रिसीव्ह केला नाही सदरचा कॉल व्हाईस रेकॉडमध्ये रेकॉर्ड करण्यात आला.त्यानंतर श्री हावशेट्टे यांचा फोन न आल्याने मी माझे मो क्र 7770000055 यावरुन लोकसेवक श्री हावशेट्टे याचे मो क्र 9403143362 यावर 16.00 वा पंचासमक्ष व्हॅाटसअप कॉल करुन कार्यालयात आले आहेत का अशी विचारणा केली असता त्यांनी साईट व्हिजीटकरिता बाहेर असुन कार्यालयात आलेनंतर फोन करतो असे सांगितले.

त्यानंतर सदर ठिकाणी जास्त वेळ थांबल्यास संशय येण्याची शक्यता असल्याने पोलीस निरीक्षक जाधव यांना वायरलेस फाटा परिसर येथे जावुन थांबावे आणि लोकसेवक श्री हावशेट्टी यांचा फोन येण्याची वाट पाहवी असं सांगितले.त्यानंतर मी व पंच पोलीस निरीक्षक जाधव असे माझे खाजगी वाहनाने आणि उर्वरीत पथक शासकिय वाहनाने वायरलेस फाटा या ठिकाणी येवुन थोडा वेळ वाट पाहिली असता श्री हावशेट्टे यांची फोन कॉल मला आला नाही त्यामुळे मी श्री हावशेट्टी यांचे मोबाईल क्रमांक 9403143362 यावर माझे मोबाईल क्रमांक 7770000055यावरुन व्हाटस्प कॉल करुन संर्पक साधला असता त्यांनी कॉल रिसीव्ह केला नाही ती वेळ 17.52 अशी होती सदरचा कॉल रेकॉर्डीग करण्यात आला. काही वेळ वाट पाहिली परंतु लोकसेवक यांचा फोन आला नाही म्हणुन मी पुन्हा पंचासमक्ष लोकसेवक श्री हावशेट्टे यांचे वर नमुद मोबाईल क्रमांक यावरती माझे मोबाईल क्रमांक यावरुन संर्पक साधला असता त्यानी कॉल रिसीव्ह केला नाही.

त्यांनतर मी पोलीस निरीक्षक जाधव यांनी सांगितले की, मी रहात असलेल्या सोसयटीपशी हावशेटी भेटतील असे सांगितले.त्यावेळी मी रहत असलेल्या सोसायटीमध्ये श्री हावशेट्टे भेटतील अशी शक्यता असल्याने सर्वानुमते पुढील कारवाई मी राहत असलेल्या देवपाम सोसायटी दौंड पुणे येथे जावुन करण्याचे ठरविण्यात आले.त्यानंतर मी माझे खाजगी वाहनाने आणि पथक,पंच असे शासकिय वाहनाने देवपाम सोसायटीचे बाहेर असलेल्या रस्त्याचे बाजुला येवुन थांबलो ती वेळ 19.30 अशी होती

सदर ठिकाणी लोकसेवक यांच्या फोनची वाट पाहीली.परंतु त्यांचा फोन आला नाही.त्यानंतर मी लोकसेवक श्री हावशेट्टे यांचे मोबाईल क्रमांक 9403143362 यावर माझे मोबाईल क्रमांक 7770000055 यावरुन व्हाटस्प कॉल 20.25 वा पंचासमक्ष केला असता त्यांनी तो रिसीव्ह केला नाही. सदरचा कॉल व्हाईस रेकॉर्डरमध्ये रकॉर्ड करण्यात आला.त्यानंतर काही वेळ वाट पाहिली परंतु लोकसेवक श्री हावशेट्टे यांचा फोन आला नाही.त्यामुळे चालु असलेली सापळा कारवाई तात्पुरती स्थगित करणेबाबत मी पोलीस निरीक्षक जाधव यांना विनंती केली असता सर्वानिमुते कारवाई तात्पुरती स्थगिती करण्यात आली. त्यानंतर पोलीस निरीक्षक जाधव यांनी मला पुढील कारवाईबाबत विचारणा केली असता मी त्यांना लोकसेवक श्री हावशेट्टे यांना आज रोजी कारवाई दरम्यान फोन केला असता लोकसेवक श्री हावशेट्टे यांनी परत फोन करतो असे सांगितले परंतु त्यांनी फोन केला नाही.त्यामुळे लोकसेवक श्री हावशेट्टे हे मला फोन करुन लाच रक्कम घेवुन भेटण्यास बोलावतील त्यावेळी पुढील कारवाई करावी अशी विनंती केली.त्यानंतर पोलीस निरीक्षक जाधव,पंच व पथक लाप्रवि कार्यालयाकडे रवाना झाले.सदरबाबतचा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

दिनांक 28/05/2025 रोजी .लोकसेवक श्री हावशेट्टे हे मला समक्ष देवपाम सोसायटी येथे रात्री 20.00 वा भेटले होते.त्यावेळी मी त्यांना टेन्टटिव्हि ले आउट,फायनल ले आउट आणि बांधकाम परवाना याबाबत विचारणा केली असता त्यांनी नव्याने हजर झालेले सीओ यांच्याकडुन ऑनलाईन मंजुरी नमुद कागदपत्राना घेतली आहे.परंतु नमुद मंजुरीबाबतची मुळ कागदपत्रे देण्यासाठी तसेच नमुद मंजुरी प्राप्त करुन दिल्याने त्यांनी दिनांक 14/01/2025 रोजी मागितलेली लाच रक्कम रुपये 3,50,000 रुपये तात्काळ मला मागितली.त्यावेळी मी त्यांना रक्कम सध्या माझ्याकडे उपलब्ध नसल्याचे सांगुन दोन तीन दिवसात लाच रक्कम उपलब्ध झाल्यास देण्यासाठी घेवुन येतो असे श्री हावशेट्टे यांना सांगितले असता त्यांनी सदरची लाच रक्कम दौंड येथील बांधकाम व्यावसायिक श्री जाधव यांच्याकडे देणेबाबत सांगुन श्री हावशेट्टी यांनी जेवढे काही रक्कम उपलब्ध आहे तेवढी रक्कम तात्काळ मागितली. परंतु त्यावेळी माझ्याकडे रक्कम नसल्याचे श्री हावशेट्टे यांना सांगितले असता त्यांनी रक्कम उपलब्ध झाल्यास फोन करा असे सांगितले. मी सदरची माहीती पोलीस निरीक्षक जाधव लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांना देवुन दिनांक 29/05/2025 रोजी श्री हावशेट्टे यांना फोन करतो त्यांनी लाच रक्कम घेवुन बोलविल्यास कळवितो त्यावेळी कारवाईकरिता यावे असे सांगितले होते.दिनांक 29/05/2025 रोजी श्री हावशेटटे यांनी फोन केले असता

त्यांनी रिसीव्ह केले नाही.सदरची माहीती मी पोलीस निरीक्षक जाधव यांना दिली होती.दिनांक 30/05/2025
रोजी रात्री 22.00 वा जे सुमारास मी रहात असलेल्या देवपाम सोसायटी दौंड पुणे येथे श्री हावशेट्टे ही भेटले.
त्यावेळी त्यांनी लाच रक्कम तात्काळ देणेबाबत मला सांगितले.त्यावेळी मी आता पैसे उपलब्ध नसुन पुढील
आठवड्यात पैसे उपलब्ध होतील असे सांगितले असता श्री हावशेट्टे यांनी त्यांनी मागितलेली लाच रक्कम दौंड
येथील बांधकाम व्यावसायिक जाधव यांच्याकडे देणेबाबत सांगितले त्यावेळी श्री हावशेट्टे यांना पैसे उपलब्ध
झाल्यानंतर जाधव यांच्याकडे पैसे न देता श्री हावशेट्टे यांना समक्ष देतो असे सांगितले असता हावशेट्टे यांनी पैसे
उपल्बध झालेनंतर फोन कर असे सांगितले.
दिनांक 03/06/2025 रोजी रात्री 21.00 वा देवपाम सोसयटी दौंड येथे श्री हावशेट्टे हे मला भेटले.त्यांनी
माझ्याकडे लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता मी त्यांना दोन तीन दिवसात पैसे जमा होतील असे
सांगितले .त्यावेळी श्री हावशेट्टे यांनी पैसे जमा झाल्यानंतर फोन करा देवपाम सोसायटी येथे रात्री भेटु असे सांगितले.
त्यानंतर मी पोलीस निरीक्षक जाधव यांना फोन करुन दिनांक 05/06/2025 रोजी देवपाम सोसायटी दौंड येथे
रात्री 21.00 वा श्री हावशेट्टे यांना भेटुन त्यांनी मागितलेली लाच रक्कम देणार आहे. त्यावेळी पुढील कारवाई
करण्याची विनंती केली.दिनांक 05/06/2025 रोजी पोलीस निरीक्षक जाधव ,पंच व पथक हे वायरलेस फाटा येथे
आले.मला सदर ठिकाणी आल्याची माहीती दिली.मी माझे वाहन क्रमांक एम एच 16 बी एम 7799 यामधुन सदर
ठिकाणी 20.25 वाजता पोहचलो.मी पोलीस निरीक्षक जाधव यांना मी रहात असलेल्या देवपाम सोसयटीमध्ये
लोकसेवक श्री हावशेट्टे हे रहात असुन सदर सोसायटीमध्ये मी त्यांना भेटणार असुन सोसायटीच्या बाहेर असलेल्या
रस्त्याच्या बाजुला थांबुन पुढील कारवाई करणेबाबत विनंती केली.त्यानंतर माझ्या खाजगी वाहनामध्ये पोलीस
निरीक्षक जाधव आणि मी आणि आमच्या मागोमाग शासकीय वाहन पंच व पथक असे देव पाम सोसायटी बाहेर
असलेल्या रस्त्याच्या बाजुला पोहचलो.ती वेळ 21.35 अशी होती.
सदर ठिकाणी मला शासकिय वाहनात बसवुन पुढील कारवाई शासकिय वाहनात करण्यात आली. पोलीस निरीक्षक
जाधव यांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर यांची माहीती दिली.त्यानंतर सिलबंद लिफाफा फोडुन यातुन मेमरी कार्ड बाहेर
काढुन ते व्हाईस रेकॉर्डर मध्ये टाकले व्हाईस रेकॉर्डर चालु केला असता त्यामध्ये यापुर्वीच्या ध्वनीमुद्रीत झालेल्या
फाईल सुस्थीत असलेल्या दिसुन आल्या .त्यानंतर डिजीटल कॅमेरा, त्यांची माहीती देवुन एका सिलबंद पाकीटातुन
मेमरी कार्ड काढुन त्यांची वर्णन नोंद करुन ते मेमरी कार्ड कॅमेर-याच्या सॉलटमध्ये इनसर्ट केले आणि सदर
मेमरीकार्डवर कोणताही डेटा नसल्याची खात्री करुन दिली.त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर चालु करुन 21.59 वाजता
माझे आणि पंच श्री वाघमारे यांचे निवेदन ध्वनीमुद्रीत करण्यात आले.त्यानंतर मला पंच पथक यांना सापळा
पर्‌ूव व सापळा कारवाईच्या अनुषंगाने सुचना देण्यात आल्या.
त्यानंतर मी पोलीस निरीक्षक जाधव यांना सांगितले की, श्री हावशेट्टे यांना पहिल्यांदा फोन करतो त्यांनी भेटणेकरिता
बोलविल्यास लाच रक्कम घेवुन जातो. त्यावेळी सर्वानुमते श्री हावशेट्टे यांना कॉल करण्याचे ठरविण्यात आले.मी
माझे मो क्र 7770000055 यावरुन श्री हावशेट्टे यांचे मो क्र 9403143362 यावर व्हॅटसअप पंचासमक्ष कॉल
केला श्री हावशेट्टे यांनी कॉल रिसीव्ह केला नाही.सदरचा कॉल व्हाईस रेकॉर्डरमध्ये पोलीस निरीक्षक जाधव यांनी
रेकॉर्ड केला.ती वेळ 22.08 अशी होती.त्यानंतर मी श्री हावशेट्टे यांना रेग्युलर कॉल करतो असे सांगुन माझे मो क्र
7770000055 श्री हावशेट्टे यांच्या मो क्र 9403143362 यावर रेग्युलर कॉल पंचासमक्ष केला परंतु सदरचा
कॉल त्यांनी रिसीव्ह केला नाही.पोलीस निरीक्षक जाधव यांनी सदरचा कॉल व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड केला ती
वेळ 22.10 अशी होती. पोलीस निरीक्षक जाधव यांनी माझ्याकडे पुढील कारवाईबाबत विचारणा केली असता मी
त्यांना लोकसेवक श्री हावशेट्टे हे रिर्टन कॉल करतील थोडा वेळ वाट पाहुया असे सांगितले. त्यानंतर थोडा वेळ श्री
हावशेट्टे यांच्या फोनची वाट पाहीली परंतु त्यांचा फोन कॉल आला नाही. म्हणुन मी पोलीस निरीक्षक जाधव यांना
लोकसेवक श्री हावशेट्टे यांना कॉल करतो असे सांगुन माझे मो क्र 7770000055 यावरुन लोकसेवक श्री
हावशेट्टे यांच्या मो क्र 9403143362 वरती व्हॅटसअप केला परंतु त्यांनी रिसीव्ह केला नाही.सदरचा कॉल
पोलीस निरीक्षक जाधव यांनी व्हाईस रेकॉर्डदवारे रेकॉर्ड केली ती वेळ 22.37 अशी होती.
पोलीस निरीक्षक जाधव यांनी मला पुढील कारवाईबाबत विचारणा केली असता मी त्यांना श्री हावशेट्टे यांनी फोन
कॉल रिसीव्ह केले नाही . तसेच फोन रिर्टन केला नाही. त्यामुळे श्री हावशेट्टे भेटण्याची शक्यता कमी असल्याने
चालु असलेली कारवाई तात्पुरती स्थगित करावी. तसेच श्री हावशेट्टे यांचा लाचेच्या रक्कम घेवुन बोलविल्यास फोन
करुन कळवतो त्यावेळी पुढील कारवाई करण्यात यावी अशी पोलीस निरीक्षक जाधव यांना विनंती केली. त्यावेळी
सर्वानुमते नमुद कारवाई तात्पुरती स्थगित करण्यात आली.त्यानंतर पोलीस निरीक्षक जाधव ,पथक व पंच असे
लाप्रवि कार्यालयाकडे रवाना झाले.सदरबाबतचा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.
माझ्याकडे काम करत असणारे श्री गाडेकर यांना दिनांक 13/06/2025 रोजी श्री हावशेट्टे हे नगरपरिषद



पोलीस निरीक्षक
दौंड पोलीस स्टेशन

कार्यालय दौंड येथे भेटले त्यावेळी हावशेट्टे हे गाडेकर यांना बोलले की, "महेश जाधव यांचे टेन्टिव्ह ले आउट, फायनल ले आउट आणि बांधकाम परवाना यांचे काम मी केले त्याचे मागितलेले पैसे देण्यास सांगितले आणि ते माझेकडे देतो असे बोलेले यावरुन त्याचे काहीतरी वेगळे चालले आहे याचा मला संशय आहे०" असे सांगितले. सदरची माहिती श्री गाडेकर यांनी मला दिली असता मी श्री हावशेट्टे यांना व्हॅटसअप कॉल केला असता तो त्यांनी रिसीव्ह केला नाही.तसेच त्यानंतर श्री हावशेट्टे यांनी मी रहात असलेल्या देवपाम सोसयटी येथील भाडेतत्वावर असलेली रुम खाली करुन अन्य ठिकाणी रहावयास गेले आहेत.मी त्यानंतर ब-याच वेळा श्री हावशेट्टे यांना कॉल केला असता त्यांनी माझा कॉल रिसीव्ह केला नाही तसेच मी दौंड नगरपरिषद येथील कार्यालयात जावुन त्यांना भेटलो असता ते माझेशी काही न बोलता तेथुन निघुन गेले आहेत. यावरुन मला लोकसेवक श्री हावशेट्टे यांचे मनात संशय निर्माण झाल्याने ते माझेकडुन लाच रक्कम स्विकारणार नाहित याची खात्री झाली आहे.
तरी माझ्या दिनांक 10/01/2025 रोजीचे तक्रारीचे अनुषंगाने दि.14/01/2025 रोजी 15.43 ते 16.40 वाजणेच्या दरम्यान देवपाम गृहनिर्माण सोसायटी दौंड येथे पंचासमक्ष केलेल्या पडताळणीमध्ये लोकसेवक श्री विजयकुमार हावशेट्टे नगररचना सहाय्यक, दौंड नगरपरिषद यांनी माझेकडे मौजे दौंड येथील स नं 202/08 या जागेचा टेन्टिव्ह ले आउट, फायनल ले आउट व बांधकाम परवाना मंजुर करुन देणेकरीता सुरुवातीला चार लाख रुपायाची मागणी करुन तडजोडी अंती साडे तीन लाख रुपायाची लाचेची मागणी स्वत:करीता आणि लोकसेवक श्री विजय कावळे,तत्कालीन मुख्याधिकारी दौंड नगरपरिषद यांचेकरीता पंचासमक्ष करुन लाच स्विकारण्याचे पंचासमक्ष मान्य केल्याने त्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल होणेस विनंती आहे.
माझी वर नमुद फिर्याद मी सांगितल्याप्रमाणे टंकलिखीत करुन त्यांची प्रिन्ट काढुन वाचण्यारा दिली. असी ती माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.
तपास अधीकारी रुपेश जाधव पो.नि अँन्टी करप्शन ब्युरो पुणे.
दाखल अधीकारी पो स ई बिंद्री.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

GOPAL BASU PAWAR(I (Inspector)) / PBMAH79241 **or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)
(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** ठाणे अमलदार
(ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची स्वाक्षरी) दौंड पोलीस स्टेशन

**Name** (नाव): GOPAL BASU PAWA
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PBMAH79241

FIR प्रत मिळाली
M.S. Jadhav

पोलीस निरीक्षक
दौंड पोलीस स्टेशन

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(से. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**